THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL
LIBRARY
OU_192912
UNIVERSAL
LIBRARY

ध्रुव प्रकाशन किरण पाचवे

# उत्पात

[ कादंबरी ]

—लेखक

**बी. रघुनाथ**

— सोल एजंट —

जोशी ब्रदर्स - बुकसेलर्स - गौळीगुडा - हैद्राबाद द.

किंमत २ रु.

प्रकाशक—
श्री. ना. पाठक, बी. ए.
ध्रुव प्रकाशन, बा. ह. संघ
गौळीगुडा, हैद्राबाद (द.)

प्रथमावृत्तीचे सर्व हक्क प्रकाशकाधीन.

मुद्रक—
श्रीपतराव पाठक,
मॅनेजर, राजा बहादुर प्रिंटींग वर्क्स,
हैद्राबाद (द.)

# सादर समर्पण

माझे मित्र

**श्री. ब. गो. गर्गे**

आणि

**श्री. ध. कृ. भिसे**

यांस—

## माझे थोडेसे—

'ध्रुव प्रकाशन'चे संचालक श्री. श्री. ना. पाठक आणि सहकारी श्री. ल. ना. सिरसमकर यांच्या स्नेह आणि कृपेने ही 'जीवन-कथा' प्रगट करता आली. त्यांचा आणि माझा उत्साह रसिकांकडून वाढला जावा.

—लेखक.

# हकीकत

---

आमच्या प्रकाशनाचे पांचवे किरण औरंगाबाद येथील मराठ-वाडा साहित्यसंमेलनाच्या ३ऱ्या अधिवेशन प्रसंगीं रसिक वाचकां-पर्यंत पोहोंचविण्यास मला फार आनंद होत आहे.

संमेलनाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनीं, विनंति केल्याबरोबर आपलीं सर्व कामें बाजूस ठेवून कादंबरीसाठीं पुरस्कार देऊन आम्हांस उपकृत केले यांबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे.

मुखपृष्ठावरील चित्र मुंबईचे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. आर. एस. मुळगांवकर यांनी काढले आहे.

त्याचप्रमाणें श्री. ल. ना सिरसमकर, श्री. ना. रं. पोतदार-श्री. व्यं. द. टिळक बी. ए., आणि श्री रं. मा. जोशो यांनीं पुस्तक प्रसिद्ध करण्यांत केलेल्या मदतीबद्दल आणि राजाबहादुर मुद्रणा-लयाच्या व्यवस्थापकांनीं अल्पावधींत मुद्रण करून दिल्याबद्दल मी सर्वांचे आभार मानून, रसिकांकडून संस्थेस उत्तमोत्तम साहित्य प्रका शनासाठीं उत्तेजन मिळेल अशी आशा करतो.

२७ मे १९४९ प्रकाशक.

# पुरस्कार

★

हैद्राबाद येथील 'ध्रुव प्रकाशन' संस्थेतर्फे परभणीचे नामांकित तरुण लेखक श्री बी. रघुनाथ यांची 'उत्पात' ही कादंबरी मराठवाडा साहित्य संमेलनाच्या ३ऱ्या अधिवेशनाच्या वेळीं प्रसिद्ध व्हावी, हा सुयोग मला अभिनंदनीय वाटतो. कारण, निजामराज्यांत जरी ४० लाख महाराष्ट्रीयांची वसती असली, तरी तेथे मराठी प्रकाशनसंस्था मात्र हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याहि आढळणार नाहींत. वस्तुत: महाराष्ट्राचा संपन्न प्रदेश मराठवाड्याच्या वाट्याला आलेला असून, औरंगाबाद सुभ्यातील लोक तर चांगलेच सुखवस्तु आणि सधन आहेत. पण, संस्थानातील विशिष्ट प्रतिकूल परिस्थितीमुळें मराठवाड्यातील जनतेच्या बौद्धिक गरजा फारशा वाढलेल्या नसल्यामुळेंच बहुधा, औरंगाबाद सुभ्याच्या समृद्धीचा फायदा मराठी साहित्याला प्राय: मुळींच मिळत नाहीं. त्या दृष्टीने 'ध्रुव-प्रकाशना' नें आतापर्यंत चार पुस्तकें प्रसिद्ध करण्यात दाखविलेली धडाडी मला कौतुकास्पद वाटतें.

प्रस्तुत कादंबरीचे लेखक श्री. बी. रघुनाथ हे कवि आणि कथाकार अशा दोन्ही नात्यांनीं मराठी वाचक वर्गात सुपरिचित आहेत. कल्पकता आणि उपरोध यांचा जो जोश त्यांच्या लिखाणात असतो, त्यामुळें तें लिखाण दुर्बोध आणि विस्कळीत असलें, तरीहि चटकदार वाटतें. 'उत्पात' कादंबरीला कथानक असें प्राय: नाहीच, व तिच्या रचनेंत बांधेसूदपणाहि कमीच आढळतो. पण, कारकुनांचें खडतर चाकोरबंद आयुष्य आणि त्यांच्या विफल आकांक्षा याचें जे उपरोधिक वर्णन, या आख्यानात केलेलें आहे, त्यांत 'उत्पात' या महनीय शब्दास शोभेल अशी घटना 'जरी

कोणतीच नसली, तरी तें पुष्कळ ठिकाणीं खोचदार आणि मार्मिक वाटते. श्री. वा. रघुनाथ यांच्या कथालेखनाचा नावाजण्यासारखा विशेष जो स्थानिक वातावरणाची रंगत, तोहि या आख्यानांत चांगला प्रतीत होतो त्यामुळें फारसे कथासूत्र नसलेलें हें सर्व आख्यान वाचकांना रोचक आणि रंजक वाटेल अशी मला आशा आहे.

मराठवाड्यातील वाढता शिक्षण प्रसार आणि साहित्यजागृती लक्षांत घेता 'ध्रुव प्रकाशन' सारख्या प्रकाशक संस्थांना यापुढें जास्त लोकाश्रय मिळेल, याबद्दल मला शंका वाटत नाहीं. निजामराज्यांत मराठी प्रकाशनावर जे निर्बंध आहेत, त्यांची मला पूर्ण जाणीव आहे. पण त्याबरोबरच राजकीय संपर्क नसलेल्या निव्वळ ललितवाङ्मयाला ते निर्बंध विशेष नडू नयेत असेंहि मला वाटतें. मात्र लेखक आणि प्रकाशक या दोघांनीहि मराठवाड्यातील उपेक्षित आणि अशिक्षित जनसमाजाला वळण लावण्याची जबाबदारी आपल्या शिरावर आहे हे लक्षांत घेऊन लेखन आणि प्रकाशन हे दोन्ही व्यवसाय जाणीवेने, चिकाटीने आणि हिंमतीनें केले पाहिजेत.

शांतिनिवास,
नागपूर शहर
२० मे ४५

ग. त्र्यं. माडखोलकर

*

# भाग पहिला

★

वामन गोपाळ रांजणीकर !

'नांवांत काय आहे?' किंवा 'नांवांतली जादू' अशा उलट-सुलट प्रश्नोत्तरांना चालना देण्यापुरती अथवा त्यांचा विषय होण्या-पुरती देखील वरील नांवाची लायकी नव्हती. त्यांत रहस्य तरी काय होतं? कोणत्या दिव्याच्या तपश्चर्येचं त्याला पाठबळ होतं? कुळाच्या महत्तेची पुण्याई त्याला चिकटली होती? पुण्याई मोडली तरी निदान विश्वाचा तिरस्कार त्याला लाभण्यासारखा होता!

दानव म्हणजे दुष्टतेची परमावधी! देवादिकांच्या सामर्थ्याला प्रगट व्हावयाला लावलं तें त्यांच्या अफाट दुष्टतेनं. मानव त्यांतल्या-त्यांत वामन गोपाळ रांजणीकरासारखा सामान्य मानव 'व' वर्णा-खेरीज देव अथवा दानवाशीं कोणत्या रीतीनं बरोबरी करूं शकत होता?

रांजणी नांवाचं कुठं कोणत्या तरी तालुक्यांत ‘ खुर्द ’ नाहीं तर ‘ बुजुर्ग ’ असावं. तें दंडकारण्याच्या शेवटच्या टोकाला होतं कीं काम्यकवनाच्या मध्यभागीं होतं याचं संशोधन करावयाला आगपिछा नव्हता. तें आर्षकालीन होतं कीं इतिहासकालाचा नेथूनच उद्गम झाला होता, भगवान् बुद्धाचा तिथं एखादा विहार होता कीं आसपास तिथं एकादं ‘ पानिपत ’ झालं होतं, याचेही पुरावे उपलब्ध होण्यासारखे नव्हते.

कालचक्राच्या कोणत्या तरी एका वळशांत वामन झाला होता, बस्!

आणखी विस्तारानं सांगायचं झालं तर, रांजणी नांवाच्या ग्रामांत गोपाळ नांवाचा कुणी सामान्य प्रपंचकर्मा होऊन गेला होता. जीवन सातत्या सारख्या महान कल्पनेला बळी पडून विवाहाची परंपरा त्यानं पुढं चालविली होती. त्या परंपरेच्या अत्यन्त प्राचीन तशा असंख्य भविष्यकाळांना प्रकाश देणाऱ्या अथांग उदरांतून वामन नांवाचं जीवनस्वरूप वर्तमानकालाच्या उरावर प्रगट झालं होतं. किंवा गोपाळरावांचा एक पुरुषार्थ सार्थ आणि सफल झाला होता, त्याचं ‘ वामन ’ हें ढळढळींत प्रत्यंतर होतं! विशेष नामं देतांना तरी काय तारतम्य ठेवण्यांत येत असेल तें असो.

वामन !

बळीराजाची पुण्यशीलता इंद्रपदाचा अधिकार मिळवूं पहात होती कीं देवत्वाचा अपहार करूं निघाली होती? अवतार कल्पनाच एका दृष्टीनें केवळ्या दुर्दम्य स्वामित्वभावनेचं प्रतीक होती!

मानवानं नाहीं तर दानवानं तपश्चर्या करायची. एखाद्या भोळ्या शंकराकडून मिळणाऱ्या वरदानानं तपाची सिद्धी आणि समाप्ती व्हावयाची. दुसरा एखादा देवाधिदेव एकदम खडबडून जागा व्हायचा. आणि अतिक्रमण करूं निघालेल्या तपःसिद्धांचं पोट फाडून टाकायचा, वध करायचा नाहीं तर त्याला कित्येक युगं वर येतां येऊं नये म्हणून पाताळांत दडपून टाकायचा. देवांना दुष्ट सहन झाला नाहीं तसा सुष्ट तरी कुठं मानवला?

अशाच एका अवताराचं नांव वामन!

पण कुठं तो युगस्मृत स्वयंभू वामन. आणि कुठं हा गोपाळराव रांजणीकरांचा कलियुगांतला पिंड वामन! तें नांव कोणत्याही अचेतन वस्तूला दिलं असत तरी त्या अवताराची पुनःस्मृती आणि पुणस्मृती ठरत होती. ह्या वामनाचं नांव उच्चारायला तरी कोण तयार होता?

नाहीं कसं म्हणावं!

कांहीं एका विशिष्ट क्षेत्रांत तें प्रथित झालं होतं तसं विशिष्ट ठिकाणीं तें उच्चारलंहि जात होतं. एका शिक्षण संस्थेंत मराठी चवथी पासून मॅट्रिकपर्यंत त्या काळचीं जीं हजरीबुकं झालीं होतीं आणि तसं इतर जें रेकार्ड ठेवलं गेलं होतं त्यांत वामनचं नांव होतंच. अखेर त्या परीक्षेतून कित्येक जणांच्या साक्षींत आणि परीक्षणांतून सही-सलामत सुटल्यावर जाड कागदावर छापलेली जी यश पत्रिका मिळाली होती, तींतहि वामनचं नांव केवढ्या डौलदार अक्षरांत झळकत होतं! पत्रिकेची चौकट जुनी झाली होती. पण नांव चौकटींत

समविण्याइतक्या तरी महत्तेला चढलं होतं ना! लिपीचा प्रकार उपलब्ध झाला होता. अन् त्या योगें प्रत्येकाचं नांव नोंदवून ठेवतां येत होतं. सावकारांच्या वह्या, शेतकऱ्यांच्या चोपड्या, न्याय आणि विद्यामंदिरांतले कागद, पोलिसांची काळीं रजिस्टरं, या क्षेत्रांतून चुकून सुटलेल्या माणसाचं नांव शिरगणतीच्या तक्त्यांत सहज येऊन जात होतं!

'विभावती' नांवाच्या मध्यम शहरांत वामनाच्या नांवाची तर आणखी कित्येक ठिकाणीं नोंद झाली होती. आणि वेळीं प्रसंगीं तें आठवण्याचा अथवा उच्चारण्याचा कित्येकावर प्रसंग येत होता. चार आण्यापासून चारशे रुपयांच्या वर ज्यांच्या मासिक मिळकतीचं मान आहे अशा सगळ्या थरांतलीं त्यांत माणसं होतीं. महिना संपण्यापूर्वीच 'विभावती'तल्या एका कचेरींतून हिशेब तपासणीच्या खात्याच्या नांवानं वेतन पत्रिकाचं (Pay-bills) सं पुडकं जात होतं आणि नियमानं परत येत होतं त्यांत वामनचं नांव सहसा सुटत नव्हतं. त्याच कचेरींत नेमकं दहा वाजतां शिस्त म्हणून निक्षून पाहिलं जाणारं हजरीचं जाडजूड रजिस्टर होतं त्यांतहि वर्गवारी प्रमाणं वामनाच्या नांवाला अवकाश होता. त्या लहानशा कचेरींतल्या विविधाधिकारी शक्ती वामनच्या विरुद्ध एकादे वेळीं चवताळून उठल्या कीं तें हजरीचं रजिस्टर आणि प्रसंगीं त्याच्या नांवापुढं पडणारी लाल फुली किंवा प्रश्नचिन्ह केवळ्या विघाताला कारण होत होतीं! साहेब आपल्या स्वभाव धर्मानुसार लाल शाई वापरीत होता. कचेरीला उशीर झाला अथवा एखाद्या केसमध्यें साहेब चिडला स

'Mr. Waman Rao, Please explain!' असा शिष्ट करडा लेखी सवाल करीत होता तो लाल शाईनच!

लाल शाई!

साऱ्या रंगद्रवांची ही सम्राज्ञी प्रसंगीं सभ्य तशी मुलखाची लुचोर! वाङ्मयभांडारांतला भला बुरा माल हिच्या फटकाऱ्यानं नेमका निवडून ठेवतां येतो तसा खोट्या नाट्या हिशेबावर पोलीसी थाटाच्या तपासणीच्या खुणा ( Ticks ) करून हिशेबी प्रान्तांतले मोठमोठे खून पचवितां येतात. नाहींतर सोज्वळ सख्यांचे खून करतां येतात! रक्ताची 'लाल'सा एवढ्या पातळपणा नतरहि या द्रवांत उतरली आहे, तशी रंगक्रीडेंत भिजून गेलेल्या वरांगनाच्या मस्त उरातली गहिरी चळवळही त्यांत भरली आहे! आणि शंकराच्या निशारलेल्या नेत्रांतली नरारी देखील त्यांत मिसळली आहे. लाल शाईबद्दल अनेक कल्पना करीत बसणं निराळं, आणि लाल शाईचे प्रताप अनुभवणं निराळं! निळ्या राणीच्या उषःकाली अथवा प्रदोषकाळीं दिमणाच्या लाल जरीन पदरावर गुलाब गीतं रचतां येतील. लावण्यांतल्या 'लाली'नं धुंद फुंद होतां येईल. पण भत्ता बिल छाटलीं किंवा पगारांत काटछाट झालीं, अथवा 'Mr. Waman Rao. Please explain' असा लाल शाईत करडा सवाल केला गेला म्हणजे 'लाली'ची निशा खाडकन् उतरते याचा वामनला चांगला अनुभव होता!

पहिली तारीख टळून गेली कीं 'विभागी'तला एक गांवठी

किराणा मर्चंट शिवप्पा आपल्या नौकराला म्हणत होता, 'अरे त्या वामनराव कारकुनाकडं जा. पैसे आले नाहींत गेल्या महिन्याचे आणखी. आम्हालाहि धंदा करावा लागतो म्हणावं!' शिवप्पा प्रमाणेंच इतर मरर फटर उधारीवाल्यांना वामनची मधून मधून आठवण होत होती!

इतक्या ठिकाणीं एकाद्या माणसाची प्रसिद्धी असल्यावर आणखी काय पाहिजे?

आपल्या नांवाचे विविध ठिकाणीं विविध प्रकारचे ठसे उमट-विण्यांतच जीविताची इतिकर्तव्यता असेल तर वामनचा तिशीपर्यंत आलेला जीवनप्रवास त्या दृष्टीनं यशस्वी झाला होता!

आज सुटी होती.

'आज सुटी आहे' याची गेल्या सात आठ वर्षांत आजच वामनला कडकडून जाणीव झाली होती.

साऱ्या नौकरवर्गाला मायबाप सरकारनं सहा दिवस झाले कीं एक दिवस मोकळीक देऊन केवढी मेहेरबानगी केली होती. कॅलेंडर्स छापलीं जात होतीं. त्यांत सुटीचेच तेवढे दिवस लाल ठळक दाख-विले होते. पढिक नौकरवर्गाला सरकारी गेल्या ज्या जंत्र्या दिल्या जात होत्या त्यांतहि प्रत्येक महिन्यांतल्या नेमलेल्या सुट्या खेरीज विशिष्ठ तारखेपुढं विशिष्ट खुणा करून निदर्शनास आणण्याची पराकाष्टा केली होती कीं 'हे सेवक बंधुनो! घाबरतां काय? ह्या पहा, अमक्या अमक्या दिवशीं आठवड्याच्या सुट्याखेरीज जादा सुट्या आहेत. चला उचला आपलं जूं आणि ओढीत रहा गाडा!'

त्या सुटीच्या खुणा पाहून धास्तावून गेलेल्या नौकरवर्गाला केवढा दिलासा वाटत असला पाहिजे. वामनला तो तसा वाटत होता. पण गेल्या सात आठ वर्षांतल्या एकाहि सुटींत वामनला आराम वाटला नव्हता. असल्या क्रमानें जीवनांतले सर्वच लहान मोठे व्यवहार आटोपायचे, असे बेत ठरविण्यांतच सुटीची सकाळ व्हायची. आणि सकाळ झाली कीं त्याच्या सर्व कल्पनांना तडा लागायचा. कारण सुटीची सकाळ म्हणजे जगद्विलयानंतरचा पहिला प्रहर नव्हता. हिमपर्वतांच्या प्रपात उत्पातांनीं अथवा प्रचंड भूस्तर कपांनीं किंवा भूपृष्ठाचा संकोच करून निघालेल्या अथांग जलनी-धींनीं जगदुत्पत्तीच्या वेळीं जेवढे विविध विक्राळ ध्वनि केले असतील तसेच आवाज नित्याप्रमाणें सुटीच्या दिवशीं सकाळीं वामनच्या कानीं यावयाचे. घरांतली झाडलोट, मुलांचे चिडके रडके आवाज, नळाला पाणी सुटल्यावर चालणारी गृहिणींची वर्दळ, भांड्यांची आदळ आपट, काय एक कीं दोन! सुटीच्या जीवनक्रमाचं त्याचं प्रातःचिंतन या गोंधळाच्या एकेक लहरी लकेरीबरोबर शतशःशकलं होऊन निःशेष होऊन जायचं. उत्तुंग प्रासादांनीं आणि कल्पलतांनीं गज-बजलेल्या अमरावती नाहीं तर अलकापुरींतली सुप्रभात कशी असेल हें 'विभावती' नामक प्राकृत नगरींतल्या एका भाड्याच्या घरांतून कल्पना करण्यापुरतं मनाला स्वास्थ्य तरी पाहिजे ना! बरं निवांत बसून जरा चहा घ्यावा म्हटलं तर तें देखील जमायचं नाहीं. रडारड गडबड, हालचाल यांचा सभोंवतीं नुसता कल्लोळ उठलेला असायचा. मग अन्न ब्रह्माच्या आराधनेतल्या साऱ्या कमी अधिक गोष्टींचो

उलथा पालथ, काढ घाल, खेचाखेच, जाळपोळ सुरू व्हावयाची. अशाहि गडगडाटांत जेवण करून जरा आराम करावं म्हटलं तर तोंच अमक्या अमक्या साहेबानं बोलावलं आहे. हें सांगायला दारावर एखादा चपराशी हजर! सुटीच्या अनित्य बेफिकिरींत जेवण झाल्या-वर अंगभर हिंदकळणाऱ्या सुरसुरीची बहार लुटण्यासाठीं आडवं झालं कीं यमधर्माचा एखादा मामुली पट्टेवाला जरी आला तरी वामननं त्याला सांगितलं असतं, 'पेन्शनचे तख्ते महामस्रीत गेलेले या डोळ्यांना दिसोत अथवा न दिसोत! पण आजचा दिवस मात्र घटकाभर वामकुक्षी करूं दे!' दारावर आलेल्या कचेरींतल्या चपराशाला काय उत्तर द्यावं, हें वामनाला समजत नव्हतं. उत्तर तयार असलं तरी तें बोलून दाखविणं परिणामी हिताचं होईल किंवा नाहीं याचा विचार करावा लागत होता. सुटीच्या दिवशीं कुत्तेघाशी करणारा नव्हे करविणारा हा कामसू साहेब एखादा मधलोबा असायचा. दर महिन्याला बरीचशी रक्कम पोस्ट खात्याच्या विश्वस्तींत निरवितां येईल असा चांगला पगार. सरकारी रीतीनं मिळालेला चपराशी घरीं राबण्यासाठीं तयार. बाजारांतून कसली ने आण करायची ददात नाहीं. व्यापाची धास्ती नाहीं. कसली उणीव नाहीं. चिंता नाहीं. गोऱ्या गुबगुबीत देहाच्या उशावरून, नाहीं तर कंचबंधाच्या सांनि-ध्यानं सुगंधी झालेल्या उशीवरून किंवा उत्तंभित वक्षाच्या उबाऱ्यांत जाग येऊन पहाटचा प्रकाश पहायचा. सुस्ती उडाली कीं चहासाठीं लाडकी हांक ऐकायची. स्नानोत्तर शाल्यवदन जेवायचं, तयार अस-लेला विडा चघळायचा. आणि मग तसं विशेष कांहीं करण्यासारखं

राहिलं नसल्यामुळं जवळच असलेल्या कचेरीकडं गमती खातर एक चक्कर करायची. अशा अवस्थेंत घातला एखादा तास कचेरींत तर बिघडलं काय? उलट सुटीच्या दिवशीं कचेरीस येऊन काम करणारा इमानदार माणूस म्हणून मोठ्या साहेबांची मर्जी जिंकता यावयाची. एथवर होत होत्या त्या गोष्टी ठीक होत्या. ही 'मधली' साहेब मंडळी सुटीच्या दिवशी कचेरींत आली, किंवा नरकांत जाऊन रुतली, एखाद्या गुत्त्यावर जाऊन रमली अथवा एखाद्या छिनालवाड्यांत जाऊन दडून बसली तरी वामनची कसली हरकत नव्हती. पण सुटींत हाताखालच्या बाजारबुणग्याला पाचारण करून मोठ्या साहेबा-जवळ मोठेपणा मिरविण्यांत काय अर्थ होता? साहेबाजवळ वजन राखून असलेल्या या मधल्या वर्गांत आणि वामन सारख्यांच्या तिसऱ्या वर्गांत फार अंतर होत. वामनची नू वामनच्या वर्गांतल्या प्रत्येकांचं सहा दिवस हाडं खिळखिळी होत होतीं. जावक पत्रांचा ढिगारा कमी करतां करतां, आवकांची नोंद घेतां घेतां, तक्ते तयार करतां करतां, नाहींतर टाईप-रायटरवर सूड उगवितां उगवितां किंवा बारा पिढ्यापूर्वींच्या हिशेबाची चाळण करतां करतां कमरेचा कणा ढिला होऊन जात होता. बोटं दुखून येत होतीं. जीव सुकून जात होता. नशांत वरिष्ठाकडून मानहानीकारक एखादा अधिक उणा शब्द निघाला कीं रस्त्यावर बसून बुटांना पॉलिश करावं, स्टेशनवर हमाली करावी, एखाद्या वेश्येचीं पायतणं डोक्यावर वागविण्याची नोकरी किंवा जीव द्यावा पण मान हानी करणारं हें शिष्ट दास्यत्व नको असं वाटूं लागतं आणि तरीहि मुलांबाळांचं कसं होईल ही चिंता

उत्पन्न होऊन आठ आठ तासांचा खर्डेघाशी पुन्हा निमुटपणानं चालू ठेवावी लागते.

मग कसल्या भुजलता, न् कसला अंग राग! कचेरीच्या भारातीर्थावरून विजयी होऊन परत आलेल्या पतिराजांच्या सेवेसाठीं, रात्रीं घरांतली सर्व आवरानिवर झाल्यावर कष्टानं खडबडीत झालेली नाहींतर बाळंतपणानं खचलेली पतिव्रता हातांत जलपात्र घेऊन शय्यामंदिरांत कीं एकाद्या पडक्या गोदामाइतकंहि ज्या जागेंत वास्तुलक्षणाचं सौंदर्य नाहीं अशा खुराडांत आली कीं तिला मांगल्याची वेळ येई, हे पतिनिष्ट स्त्रिये! प्रेमदान कीं कामदानाचा उत्साह आठ आठ तासाच्या कुत्तेघाशींत नष्ट झाला आहे. विप्रलंभ शृंगारापुरत्याहि वृत्ती कोमल राहिलेल्या नाहींत! आलीस तशी परत जा. नाहींतर परिणामी पुन्हां ओकाऱ्या, पुन्हां सुईण, पुन्हां पाळणा, आणि सर्वावर कडेलोट म्हणून डॉक्टरचा उंबरठा आणि पैशाची ओढाताण! सुटीच्या दिवशीं हटकून पाचारण करणाऱ्या 'मधलोबा'-वर वामन चिडत होता. त्याला खेटरानं मारावं, नाहींतर थुंकावं किंवा रक्त ओकेपर्यंत त्याला लाथाबुक्या खालीं ठेचून काढावं असं त्याच्या मनांत येत होतं. त्याच्या अंगांतला कण न् कण त्वेषानं उफाळून येत होता. पण कचेरींत जाईपर्यंतच ही आग टिकत होती. तिला प्रकट करण्याचं सामर्थ्य कसं कोण जाणे! कचेरीच्या पायरीवर पाय ठेवतांच निवून जात होतं कीं, गोठून स्थिर होत होतं कीं गुसतं आंतल्या आंत भडकत उतरत होतं, कांहीं कळत नव्हतं. त्वेषानं झापरं नेवढं अंगावर वाहत वामन खुर्चीवर बसत होता. मग टेबला-

वर आधींच येऊन पडलेलो फाईलींतली एक फाईल उचलीन दर्शनी कागदावरल्या संदर्भाच्या अनुरोधानं तो लिहायला आरंभ करीत होता,

' Dear Sirs ... ...

आणि अखेर शब्द-प्रवाहाबरोबर आपल्या संताप-लहरीसह वामन वाहून जात होता !

आजची सुटी असा व्याप ताप वाढवून सुटीच्या सुखद कल्पनेंतला आनंद नाहींसा करणारी नव्हती. ती खरंच कांहीं अपूर्व होती. गेल्या सात आठ वर्षांत अशी सुटी कधीं आली नव्हती आणि पुढं नऊ दहा वर्षं कधीं येईल कीं काय याची खात्री नव्हती. एक सुटाहि होती. बस ! किंवा दुसरी सुटी ती येणार होती कीं ज्या दिवशीं सकाळ झाली आहे किंवा नाहीं हें कळायला अवधान जागं नव्हतं. किंवा तें तसं ठेवण्याचं कारण नव्हतं. घरांत गोंधळ, रडारड कामाची वर्दळ चालली आहे, याची वामनच्या जाणिवेला जाणीवहि नव्हती. तसच्या साहेबान बोलावलं आहे म्हणून दारावर कोणते चपराशी खेटे घालीत आहेत, याची कल्पनादेखील करता येणार नाहीं अशी ती अवस्था होती. किंवा उशीर झाल्यामुळं ' Mr: Waman Rao, please explain ' असा लाल शाईत त्याला कुणी सवाल केला आहे किंवा नाहीं हें पाहण्याची तत्परताहि तो घेत नव्हता !

आजच्या सुटीचीच ती परिणत अवस्था असावी हें निःसंशय ! सकाळ झाल्यापासून रात्रीं निद्रानीज होईपर्यंत, विशेषतः

सुटीच्या दिवशीं वर्दळ आणि गोंधळ करून एकच झिम्मड उड-विणारा आप्तेष्टांचा जथ्था सकाळच्या तीनच्या गाडीनं त्यानं पोंच-विला होता. तो परत येणार होता कीं तसाच गाडींतून काशीला. काशीहून रामेश्वरला कल्पांतापर्यंत प्रवास करीत राहणार होता. अथवा येणार असेल तर केव्हां आणि कोणत्या गाडीनं परत येऊन विभावरींत उतरणार होता, याची त्या सुटीच्या राम-प्रहरांत त्याला आठवणहि काढावीशी वाटत नव्हती. उरलेला अवधी एकांतानं निजून निर्विचार, निःशंक आणि निर्भय काढायचा, हेंच त्यानं नक्की केलं होतं. आणखी, दुसरी विशेष घटना अशीं कीं सुटीच्या दिवशीं त्याला छळणाऱ्या त्याच्या त्या खाष्ट 'मधलोबा'ची बायको कालच खलास झाली होती. तिला क्षय झाला होता कीं वाळत रोगानं ती पछाडली होती, तिला हिस्टेरिया होता कीं तिचा गर्भपात झाला होता, ह्याची चौकशीं करण्याच्या भानगडींत वामन पडला नव्हता. तो बायकोच दहन करो नाहींतर दफन करो, तिची शवपेटी उचलून तिच्या नाहीतर त्याच्या जन्मभूमीला पाठवो नाहींतर एकाद्या पदार्थ संग्रहालयाकडं रवाना करो. वामन प्रेतयात्रेला गेला नव्हता किंवा मागाहून कोरडी सहानुभूति व्यक्त करण्यासाठीं त्याच्या घराकडंहि वळला नव्हता. सहानुभाव काय म्हणून व्यक्त करावयाचा होता? असा कोणता आपलेपणा वामनच्या मनांत त्यानं उत्पन्न केला होता? प्रसंग असे आले होते कीं इतर कारकुनाच्या बायका घरीं अडल्या अवस्थेंत मृत्यूचे मंत्र जपत पडत होत्या. त्यांचे कष्टी चिंता जर्जर नवरे अत्यंत कळवळ्यानं म्हणत होते, 'साहेब माझा एवढा रजेचा

अर्ज शिफारस करून मोठ्या साहेबाकडं पाठवा!' हा मधलोबा त्यांना वेठ्यांत काढीत होता. अन् दरडावून म्हणत होता, 'तें फलाणं स्टेटमेंट झालं? उशीर झाला तर मी तुम्हाला जबाबदार धरीन. तारेनं रिमाइंडर्स येऊं लागले आहेत, बघा!'

हे सारे प्रसंग वामनला आठवले. त्याचा हंबरडा वामननं कल्पनेनं ऐकला आणि तो मनोमन म्हणाला देखील, 'कर लेका आतां पाहिजे तें स्टेटमेन्ट! ये म्हणावं कचेरीला आणि बोलाव साऱ्या हाताखालच्यांना सुटींत! साहेबाकडं जा. त्याचे पाय चाट. त्याच्या पुढं नाक घास, नाहीं तर वाटेल त्याच्या वाटेल तशा शिकायती लिहून पाठव. पुन्हा लग्न कर आणि रडत बैस! आम्हाला छळ-लंस त्याचा नियतींनं उगवलेला हा सूड आहे समजलास! आणखी एकदोन सुन्या होई पर्यंत तरी तुझं कचेरीला येणं बंद!'

वामन स्वभावतः दुष्ट नव्हता. ज्याला स्वतःचं चांगलं करण्या पुरतंहि सामर्थ्य नव्हतं तो आपली दुष्टता तरी कशी प्रगट करणार? बलिष्ठांच्या दुःखानं, अवनतीनं अथवा पतनानं, विद्ध अवमानित दुर्बलांना जें समाधान वाटतं तसंच वामनला वाटलं होतं. त्या मध-लोबाच्या दुःशब्दानं आणि चढेल वागणूकीनं वामनच्या हृदयाचा जो भाग जखमी झाला होता, तो त्या प्रसंगानं थोडासा बरा झाला कीं काय न कळे!

प्रतिकार करण्याची शक्ती माणसांत उरली नसली म्हणजे जुलमी वर्गाबद्दल अशा तऱ्हेची हीन भावना दलितांच्या मनांत निर्माण झाल्यास नवल नाहीं.

वामनला आतां चांगली जाग आली होती. सूर्यप्रकाश आभाळांतून केव्हांच फुटला होता. 'विभावरी'तल्या कित्येक इमारतींच्या खिडक्यांतून नेथाल निद्रामग्नांना तो डिवचीत असावा. पण वामनच्या घरांत प्रकाश किरणांना अद्याप प्रवेश झाला नव्हता. तें घर असं होतं कीं एवढ्या विश्वव्यापी प्रकाशाचा अनुग्रह प्रथम त्याला लुटतां येत नव्हता. माणिक मोत्यांचं दान लुटण्यासाठीं एखाद्या राजवाड्या पुढं जमलेल्या भिकाऱ्यांच्या समुदायांतल्या लंगड्या, खुळ्या आणि म्हाताऱ्या भिकाऱ्या सारखी त्या घराची अवस्था होती. पांच सहा रुपय भाड्याचं घर तें. चुनेगच्चीची कित्येक टुमदार घरं 'विभावरी'त भाड्यानं मिळूं शकत होतीं. पण तीं महाग होतीं. आणि महाग घर वामनला झेपण्यासारखं नव्हतं. प्रवेश करतांच संतोष होईल अशा तऱ्हेची सजावट केलेला एक लहानसा दिवाणखाणा आपल्याला बसायला हवा, प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला असलेल्या खिडक्यांना भडक गुलाबी रंगाचे रेशमी पडदे असावे, मधल्या भिंतीशी मांडलेल्या उंचो बैठकीवर, किंवा झुलत्या आराम खुर्चीवर गमतीनं अंग टाकलं तर घराच्या सुरक्षित उद्यानांतून फुलांचा सुगंध वाहून येत असलेला कळतो आहे किंवा भितीवरील प्रतिकृतींवर नजर खिळली जात आहे, नाहीं तर समोरच्या खोलींत एका भारी ड्रेसिंग टेबला पुढं बायको प्रसाधन करीत असलेली दिसत आहे, अशी विविध कल्पन-चित्रें आपल्याला घर कसं असावं या संबंधीं वामनच्या मनांत तरंगून थिजत आलीं होतीं. सध्याच्या घरांत यायेची एकदी कल्पना गेल्या सात आठ वर्षांत सजीव झाल्याचं आठवतं

नव्हतं. घरांतील वास्तुलक्ष्मीच मूळची उदासीन होती, कीं वामनच्या उद्दाम निराश चिंतनाच्या सातत्यानं तिची प्रसन्नता बिघडली होती, कांहीं कळत नव्हतं! शिकलकऱ्यांच्या चलावू झोपड्या तरी या घरांपेक्षां चांगल्या असाव्या असं त्याला वाटत होतं. गमतीची गोष्ट अशी कीं घराच्या बाजूला पिठाची गिरणी होती. जागृतावस्थेंतल्या कोणत्याहि क्षणीं तेथली भकभक कानावर पडत होती. गिरणीच्या आसपास राहणाऱ्या, सौख्याला आंचवलेल्या कंगाल माणसांची कर्म-कहाणी कोणत्या स्वरांनीं गायिली जाणार होती? वामनला कधीं झोंप लागलीच तर जमीनीला न् भिंतीना प्रचंड हादरे बसून भूकंपगत उत्पातांत आपण गडप होणार कीं काय, या भयानं वामन चटकन् जागा होत होता. मग ते गिरणीच्या एंजिनचे हादरे आहेत हें त्याला कळून येत होतं. घराच्या लहानशा अंगणांत वाकडं तिकडं वाढलेलं एक लिंबाचं झाडंहि होतं. त्याची छाया घरभर आणि घरांत तर मुळींच पडत नव्हती. त्या वृक्षाला कांहीं पुराणेतिहास नव्हता. त्याचं प्राकृतत्व पाहूनच कीं काय एकाहि महाभागानं त्याखालीं केव्हां तपश्चर्या केली नसावी. त्याची असुंदरताच इतकी असीम होती कीं एकाहि रमणीनं त्याला लत्ताप्रहारानं भूषविल्याचं उदाहरण नव्हतं. कोणत्या युगांत त्याला मधुर फळं आलीं असतील अथवा येतील, या संबंधीं तर्क करावयाला भूमिका देखील नव्हती. कटुता हेंच त्याचं जीवन सर्वस्व होतं! त्यानं अंगणातली नुसती जागा अडविली नव्हती तर वाऱ्याचे मामुली फटकारे न झेपतां आले तर अंगणांत पाचोळा जमा होऊन केर कचऱ्यांत भर पडत होती! त्या घरांतून

निवास करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनाचं जीवनोद्देशाचं, आणि जीवनार्जनाचं तें प्रतीक होत !

लिंबाच्या झाडाबद्दल वामन आणखी कांहीं विचार करणार तोंच नळाची प्रारंभीची खळखळ धार बारीक होत आल्याचं त्याला ताडलं. तिथं भांड्यांचा आज खणखणाट नव्हता. धांदलीचे आवाज नव्हते. घाईचे पदक्षेप नव्हते. पाणी लवकर बंद होईल म्हणून उगीच जीव टाकणाऱ्या बाया नव्हत्या. आपल्याला थोडं बहुत पाणी लागेल असा विचार येतांच तो उठला आणि एक दोन भांडीं मोठ्या उत्साहानं त्यानं भरून ठेवलीं.

घरांत कुणीच राहिलं नव्हतं. चहा घेणं तर अवश्यक होतं. काव्यमय जीवनाची हाव मनांत बाळगणाऱ्या माणसानं चहा घ्यायचा नाहीं म्हटलं तर मग काय प्रातःस्तोत्र म्हणत बसायचं होतं? हरिपाठाचे अभंग गर्जून गावयाचे होते? चहा हातानं करून घ्यावयाचा म्हणजे केवढं जिकीरीचं काम होतं. जाळ तयार करणं, भांडीं शोधून काढणं, चहा आणि साखऱ्याचे डबे हुडकून काढण्यासाठीं घर डोक्यावर घेणं, अशा कित्येक दिव्यातून जावं लागत होतं. त्यापेक्षां एखाद्या मोडींजोदागेत उत्खनन करून मिळतील त्या मृत्कणांचं वजन करून नोंद ठेवणं, नाहीं तर हवेंतल्या हिमकणांचा ( Dew Points ) हिशेब करीत बसणं अधिक चांगलं नव्हतं?

वामननं कपडे केले आणि चहा घेण्यासाठीं तो घराबाहेर पडला.

दिवसाच्या त्या पहिल्या प्रहरांत हॉटेलं गजबजून गेलीं होतीं.

वामन तरी आणखी कोणत्या राजवाड्यांत जाणार होता? एका रिकाम्या खुर्चीवर बसून, आलेला चहाचा कप त्यानं चटकन् रिकामा केला. तो पिऊन न प्यालयासारखा त्याला वाटला. आणखी एक कप मागविल्यावर मात्र त्यानं हळूं हळूं घुटके घ्यायला आरंभ केला. कित्येक दिवसांत अशा निश्चित मनानं त्याला चहा घेतां आला नव्हता. अन् असा चहाहि मिळाला नव्हता. विद्यार्थी दशेंत शिक्षण केंद्राच्या ठिकाणीं वेगवेगळ्या हॉस्टेल्समधून त्यानं अनेक वेळां चहा घेतला होता. 'सेव्हॉय' हॉटेलांतल्या विलायती चहाचं वर्णनहि त्यानं कल्पनेनं ताडलं होतं. तेथलीं तरतऱ्हेचीं भारी सुबक चहापात्रं, तीं आणून ठेवणाऱ्या पश्चिम देशांतल्या त्या धीट पण सुगौर नम्र परिचारिका, कानांवर पडत असलेलं सुस्वर संगीत, चपल नर्तिकांची धुंद करणारी अंगमोड काय एकेक रम्यरुचिर गोष्टी असाव्या त्या! नौकरी करूं लागल्यापासून त्या कल्पना रंजित चहाचं नुसतं आंबट वरण होऊन गेलं होतं! घरीं त्याला चहा कधी वेळेवर मिळाला होता? एकादे वेळीं मिळाला तरी त्याला कांहीं चव होती? कान तुटलेला कप हेंच जेथलं सुबक चहापात्र, रडक्या मुलांचें आणि चिडक्या गृहिणींचे कमी अधिक उंच कठोर आवाज हेंच जेथलं सांघिक एकमेव सुस्वर संगीत अशा ठिकाणच्या चहाला काय चहा म्हणायचं होतं?

आतांच्या हॉटेलांत तरी असा शाही सरंजाम होता असं नव्हे; पण तो घरच्या पेक्षां तो पुष्कळ निराळा होता. हा सार्वजनिक पान मंदिराची कल्पनाच तसं पाहिलं तर किती रम्य होती! कोणत्या

विचारवंताच्या डोक्यांतून ती निघाली असेल ती असो. आणि ती तशी निघण्यासाठीं कोणत्या परिस्थितीचे तडाखे त्यानं झेलले होते? कुटुंब संस्थेत खाण्या पिण्यासारख्या दिसायला क्षुद्र पण परिणामी मोठ्या अशा गोष्टी किंवा सोई होत नसाव्या म्हणूनच हॉटेलं उभारण्याची पद्धति निघाली असावी न् काय! चहा म्हटला कीं मागितल्याबरोबर तयार! हॉटेलांत शिरलं कीं 'काय साहेब चहाच ना,' हे विचारण्याची तत्परता केवढी! घरांतला प्रकार असा नव्हताच. पांच सहा माणसांतून एखादी अन्नपूर्णा धुणं, पाणी, मुलं यांच्या व्यापतापांतून मोकळी असणं, चूल पेटविणं, ती पेटविण्यासाठी एखादे वेळीं सर्पण अपुरं असणं, साखर चहा दुधाचा पुरवठा आहे कीं नाहीं हें पाहणं अशा कित्येक अतिक्षुद्र पण फार बोचऱ्या गोष्टीकडं लक्ष पुरवावं लागत होतं. हा सगळा बातमेळ कधीं ठीक ठाक जमल्याचं बामनच्या स्मरणांत नव्हतं. कसलं तरी उकळलेलं कळकट पाणी आजवर तो घशाखालीं ओतीत आला होता. त्या ऐवजी एखाद्या औषधालयांतलं अडुळशा अरिष्ट किंवा मद्रदेशीय सांबार घट घट पिऊन टाकणं शक्य वाटत होतं!

हॉटेलचा मामलाच कांहीं निराळा होता. ठरावीक पैसे फेकले कीं काम खलास! कसली वाट पहात बसायचं नाहीं. एखाद्या उणिवेनं मन खट्ट व्हायचं कारण नाहीं. 'ने आण' करायची कटकट नाहीं. कांहीं नाहीं! खरंच जीवनांतलं सुखार्जन या हॉटेलच्या पद्धतीवर करतां आलं तर? चहाची तल्लफ आली कीं फेकले पैसे घेतला चहा! एकटं, एकीकडं, ज्या ठिकाणीं घरांतला गोंधळ नाहीं, गिऱ्हाईकांची

भकू भकू नाहीं, अशा ठिकाणीं येऊन निजायचं ठरलं कीं घेतली एक खोली आणि केला आराम! विकारांची हांक आली कीं पाहिला एकदा आडवळणांतला उंबरठा आणि केलं घटकाभर विषय रंजन! घटकेच्या सुखासाठीं एकाद्या भाड घरांत सर्व वस्तूंचा आणि आप्तेष्टांचा कारखाना करून राहायचं. त्यांची फूट तूट डोळ्यांनीं पहायची, आजारांनीं बेजार व्हायचं आणि सर्वांत महत्वाची अत्यंत त्रस्त करणारी गोष्ट म्हणजे ह्या सर्वांच्या जबाबदारीच्या ओझ्याखालीं आपण स्वतः खचून जायचं! विविध वस्तूंचा हा पसारा आत्मविकासासाठीं होता कीं एकाद्या विकासशील मनाच्या विनाश विध्वंसासाठीं होता? हिम प्रदेश तुडवीत निरनिराळ्या दिशेनं आलेलीं माणसं एकत्र झालीं आणि त्यांनीं कळप करून राहण्याची पद्धत रूढ केली. घटका घटकांच्या वैयक्तिक पसाऱ्याला कुटुंब नांव दिलं! कां म्हणून त्यांनीं एवढा यातायात केली असावी?

काल गणनेला प्रारंभ होऊं लागल्या पासून दीड दोन हजार वर्षां नंतर विभावती नगरीतल्या एका हॉटेलांत फर्मास चहा पीत बसलेला एक संसार-जर्जर मानव आपल्या समाज पद्धतीची अवहेलना करील याची त्या आदिमानवांना काय कल्पना?

चहाचे घुटके घेतां घेतां वामन आजू बाजूला पाहूं लागला. हारीनं मांडलेलीं टेबलं खाद्य पेयांच्या पात्रांनीं भरून गेलीं होतीं. खुर्च्या रिकाम्या होतांच पुन्हां भरून जात होत्या. झिपऱ्या हालवीत हॉटेलचीं पोरं धावपळ करीत होतीं. ग्राहकांत न्याय खात्यांतले कांहीं कारकून आणि उमेदवार होते. चोरबाजारांतले सोद्दे होते.

एकादशीच्या दिवशीं प्रत्येक भाविक हिंदूच्या दुकानांतून दक्षिणा उकळणारे कोवळे धर्ममार्तंड होते तसे जगण्याचा एकच धर्म माहित असलेले उन्मार्गगामी होते. तो पलीकडचा श्मश्रुळ भिकार कटलरीच्या दुकानाचा मालक होता. हा हिकडचा 'हनुमान कॅप फॅक्टरी'तला शिवणकरी होता. ती पलीकडली निळ्या सॅटिनची मळकट टोपी घातलेली मूर्ती 'सीताराम टेलरिंग फर्म'ची सूत्रधार होती. हा हिकडचा पोशाखी अमीर देशी विदेशी औषधांच्या बाटल्यावरील धूळ झटकणारा खाजगी कंपाउन्डर होता. भिन्न प्रकृतींच्या त्या सम्मेलनांतली तीन चतुर्थांश संख्या स्त्रीनं अशीच असली पाहिजे की ज्या मनस्थितींत वामनाला त्या पानगृहात यावंसं वाटलं होतं, आणि नेहमी करतां तिथं येणं हिताचं वाटत होतं मुलाबाळांच्या आरडाओरडींत, घर कामानं सुकलेल्या गृहदेवतांच्या खडबडीत हाताचा चहा घेणं त्यांना सुखकारक वाटत नसावं.

हॉटेल जोरांत चालत होतीं ह्यांतच कुटुंब संस्थेच्या विफलतेचं रहस्य होतं! मोठमोठीं 'गृह', कांहीं बादशाही 'महाल' कांहीं 'निवास' आणि 'आश्रम' यांची नांव आणि जाहिराती वामनला कित्येक वेळां ऐकण्याचा आणि वाचण्याचा प्रसंग येत असे. अमका पुढारी अमक्या शहरांत फलाण्या हॉटेलांत असतो. तमक्या संस्था-निकाचा निवास अमक्या 'महालांत' आहे, अशा, वर्तमानपत्रं ठळक बातम्या देत होतीं तें उगीच कीं काय? तीस रुपयापासून सुरूं होणारं कर्तृत्वाचं मूल्य, रोजचं आठ आठ तास खपून दोन वर्षांनीं होणारी एकादशांश पगारवाढ निकींत साठ रुपयापर्यंत नेऊन पोंच-

वायचं, हें न कां आपल्या जीवनाचं एकमेव ध्येय, अशा प्रश्नानं वामनच्या जीवाची कित्येक वेळां तडफड झाली होती. हा प्रश्नहि अशा वेळीं मनांत आला होता कीं ज्या वेळीं पन्नावन्न वर्षापर्यंत आयुष्य ढकलीत नेल्य शिवाय गत्यंतर नाहीं अशी कठोर जाणीव होण्याचं सुरू झालं होतं ! इच्छा आकांक्षा माणसाच्या पुढं धावूं लागल्या आणि त्यांचा पाठलाग करतां करतां थकत चाललेला माणूस मागंच रेंगाळत राहूं लागला म्हणजे मनाची काय दशा होत असावी ? नित्याच्या विचारांतून आज तो वामन सुटला होता खास ! प्रपंच्यातल्या रोजच्या हजार भानगडी पैकीं सुटीच्या दिवशीं ज्या हटकून पुढं येत होत्या त्यापैकीं आज एकहि नव्हती त्या भानगडी उत्पन्न करणारा वर्गहि आज जवळपास नव्हता. स्त्रीवर्गापैकीं एकीला आज एकादं लुगडं आणलंच पाहिजे अशी टोचणी नव्हती. घरांत अमक्या खाद्यपेयाच्या पदार्थांचा पुरवठा संपला आहे, तो केला पाहिजे असंहि मांगणार कुणी नव्हतं. बायकोला थंडीताप आला आहे. आईची दाढ दुखते आहे, मुलगी ठमकते आहे नाहींतर ओकते आहे, भाच्यांचा कान फुटला आहे, अशा दवाखान्याकडं ओढून नेणाऱ्या आणि बिलं भरतां भरतां बेजार करण्याऱ्या वार्ता ऐकूं आल्या नव्हत्या.

तेथल्या समुदायाकडं मोठी महानुभावाची नजर टाकून वामनन बिलं चुकविलं. तेथल्या लज्जतदार चहाचा आणखी एकादा कप वामननं सहज घेतला असता. त्या रुचिरोत्पन्न पेयानं जिभेवर विशेष प्रकारचा कांटा उभा राहिला होता. सर्वत्र अंगांत कांहीं अपूर्व तरारी

खेळूं लागली होती. पण पैसे कमा होते. आणि जे होते त्यांतून आणखी कित्येक व्यवहार आटोपायचे होते. पैसे कमी असावे, या विचारानं त्याच्या तरारीला थोडासा धक्काच बसला कीं काय कोण जाणे! मग चहाचा दुसरा कप घेण्याची ऊर्मी दाबून त्यानं चहाच्या एक चतुर्थांश किंमतीच्या सिगारेटस् घेतल्या. एक खिशांत टाकली आणि दुसरीचा पहिला झुरका घेतांच दुकानदाराच्या आरशांत त्याची नजर गेली तो काय! दाढीनं चेहऱ्यावर मोठी विद्रुप कळा आणली होती! ती आजवर अशी बेदरकार आणि कपर्देहि ताळतंत्र न ठेवतां कशी वाढली होती कुणाला ठाऊक? दाढीचं हें सोंग घेऊन हॉटेलांत शिरणं अथवा रस्त्यावर मिरवणं म्हणजे काय आपल्याला वेड लागलं होतं कीं एखाद्या दीर्घकालीन अनुष्ठानाची आपली तयारी चालली होती? छे! दाढीच्या हिडीस, ओंगळ, विद्रुप आणि बोचऱ्या जंजाळांतून ताबडतोब आपण सुटका करून घेतली पाहिजे! दाढी तिसाव्या वर्षाची असो नाहीं तर साठी उलटल्यानंतरची असो! तिच्या राकटपणाची जाणीव होणं आणि तत्काळ तिच्यावर शस्त्र घेऊन उठणं म्हणजे जीवंतपणाचंच लक्षण नव्हतं तर काय? दिवस असे येऊन गेले होते कीं कित्येक मनोरम कल्पनाशीं खेळत करण्याची ही गलमफाईची क्रिया रोजच्या वक्तशीर झटापटींत मनासारखी करतां आली नव्हती. नोकरीसाठीं एखाद्याला भेटायला जावयाचं आहे म्हणून दाढी करणं, सांगून आलेली पोरगी पहायला जाण्यापूर्वी दाढी करायला बसणं, एखाद्या व्यासपीठावरून वक्तव्य करण्यासाठीं निमंत्रण आल्यावर दाढी करणं आणि कचेरीच्या

धास्तीनं दाढी आटोपणं या तिन्ही चान्ही अवस्थांतल्या मनस्थितीं। अंतर असलं पाहिजे !

दाढीविषयीं अशाच कित्येक कल्पना करीत वामननं त्या हमरस्त्यावरल्या एका गांवठी श्मश्रमंदिरांत प्रवेश केला. दुकानांतल्या दोन्ही खुर्च्या गुंतलेल्या होत्या. एकाच्या तोंडावर पाण्याचा फवारा उडविला जात होता. अन् दुसऱ्याच्या गालावर साबणाच्या फेसाचीं पुटावर पुटं चढविलीं होती. एक वाट पहात होता. आणि दुसरे दोघं संतोबा न्हाव्याचा हात कसा काय फिरला आहे हे लहानशा आरशांत पडताळून पहात होते. संतोबा न्हाव्यानं दुकानाला अलीकडं रंग तर चांगला आणला होता. भिंतींना जीं चित्रं होतीं त्यांत निवड अथवा आवडीचा कांहींच प्रश्न नव्हता. अमक्या विशिष्ट पंथाचे अथवा जातीचे तिथं लोक येत होते असं नव्हे ! म्हणून प्रत्येकाच्या रुचीला तिथं अवकाश होता. आतां एक सिनेमाचा डोअरकीपर होता. एक बस सर्व्हिसचा ड्रायव्हर होता. एक पोलीस आणि एक 'जान'चा तबलची वाट पहात होते. बस-ड्रायव्हरनं मुद्दाम समोरच्या हॉटेलांतून मागविलेले सिंगल घशाखालीं ओतून आणि कानावर विझवून ठेवलेली सिगारेट पुन्हा पेटवून संतोबानं न् त्याच्या जोडीदारानं कामाला सुरवात केली. गप्पांना रंग चढूं लागला. कानजळगांवच्या दोन जवान पोरी काल इंटरव्हलमध्यें सिनेमाच्या थिएटरांत नाचविल्या होत्या. चांगली मारामारी होऊन अर्धा खेळ बंद ठेवला होता. परवा कुणी वानगाविसी पळून जात असतां 'बस' मध्येंच सांपडली होती. एक दिवस ती ड्रायव्हरच्या घरीं होती आणि

मग ती तेथल्या पोलीसानं ठाण्यावर आणली होती. स्थानिक गावगंगांच्या समुदायांत एक नवी भर पडली होती. आणि ती नवी असल्यामुळं तिच्या रंगरूपाचं वर्णन उघड्या भाषेंत चाललं होतं. विभावतीच्या आडवळणांतून नाहीं तर सार्वजनिक करमणूकीच्या ठिकाणीं फार मोठे उत्पात घडत होते तर! दहा वाजतां कचेरीला जाऊन सहाला परत येणाऱ्या आणि या जाण्या येण्यानंच ज्याच्या वृत्ती शुष्क झाल्या आहेत अशा एका कारकुनाला या घटनांत कधीं भाग घेतां येणं शक्य होतं? पोलीस, ड्रायव्हर, तबलजी हीं कांहीं निराळ्याच जातीचीं माणसं असावीं. सुख ग्रहणाचं एकादं अपूर्व इंद्रिय त्यांना लाभलं तर नव्हतं!

गुळसफाई नंतरचे सोपस्कार झाल्यावर वामननं आरशांत डोकावून पाहिलं. कांहीं तरी अपूर्व नवलाई चेहऱ्यावर झळकत होती. आजवर तो ज्या ठिकाणीं होता त्या भयाण अंधार कोठडीचा दरवाजा कुणी तरी खाडकन् उघडला होता. आणि नव्या सुप्रसन्न प्रांतांत त्यानं प्रवेश केला होता! वाढत्या वयाची पानझड एकदम थांबून जणूं जवानीचा वसंत पुन्हा बहरूं लागला होता! कुठल्या तरी थिएटरांत नाचलेल्या दोन जवान पोरी त्या चेहऱ्यावर भाळल्या होत्या! अन् म्हणत होत्या, "नका टाकुनि जाउं डावा डोळा पाण्यानं ..." बस मधून 'निघून' जात असलेली कुणी रंभा की उर्वशी वामनच्या चेहऱ्याकडं पुनःपुन्हा पहात होती! नाहीं तर कुठल्याशा आडवळणांत सारंगीच्या स्वरांतून हळुवार उमटून पडणारा आवाज आणि आलाप ऐकत वामननं प्रवेश केला होता आणि

गायिकेनं त्याचा हात धरून पलीकडच्या तक्याशीं बसवलं होतं ! किंवा वयाची तिशी आणि तिच्या भोंवती निर्माण झालेले अनेक तट फोडून वामननं विद्यालयीन जीवनांत प्रवेश केला होता. आणि नीला म्हणत होती ' पुन्हां केव्हां येणार वामन तूं ?' निदान एका नटीच्या चित्राचं प्रतिबिंब नेमकं वामनच्या आरशांत पडलं. दाढी केलेला चेहरा पाहण्यासाठीं आसपास तसं कुणी आहे कां ही विवंचना त्या चित्राच्या योगानं सहज दूर झाली असावी. वामननं कोट घातला आणि मोठ्या समाधानानं तो बाहेर पडला.

ज्यानं सात आठ वर्षं इमाने इतबारे नौकरी केली, कुटुंब रक्षणाच्या तटाला वारंवार पडणाऱ्या भगदाडांच्या डागडुजीसाठीं परिश्रम केले, चार संभावित माणसं ज्या पद्धतीनं जगतात तशा रीतीनं दिवस कचेरींत आणि रात्र घरांत घालविली. कधीं सुटीचा मनासारखा उपयोग घेतां आला नाहीं, अशा माणसाला एक अपूर्व दिवस उगवल्याची जाणीव झाली, रोजची सांसारिक कटकट नाहीं, व्यवसायाचं बंधन नाहीं, मन मानेल तसा चहा घेतां आला, अशा माणसानं उरलेला वेळ आतां कुठं घालवावा ?

एखाद्या व्यवसायबंधूकडं जाऊन बसावं म्हटलं तर अनित्य असं तिथं काय दिसणार होतं ? काय ऐकायला मिळणार होतं ? रोजच्या प्रपंचांतली तीच रडारड, ओढाताण, दीन कष्टाळू चेहरे आणि काय करावं सुखी होण्यासाठीं हा न सोडवितां येणारा चमत्कारिक प्रश्न ! या प्रश्नांत गुरफटून आजच्या संतोषाचा माज नाहींसा करावयाची वामनच्या मनाची तयारी नव्हती.

ज्या विषयांनीं न् व्यवसायांनीं जीवनाचा नित्यक्रम वेढला आहे त्या खेरीज असतील नसतील तेवढ्या गोष्टी कराव्या, किंवा तशा विषयांची चर्चा करावी, भौतिक शास्त्रांची प्रगती कुठवर आली आहे याचा अंदाज घ्यावा, किंवा 'अध्यात्मां'तून कांहीं निष्पन्न होणार आहे कां या विषयीं तर्क करीत बसावं, मरणोतर जीवनांत कांहीं तथ्य असेल कां हें कुठं तरी ऐकावं नाहीं तर वाचून पहावं. अन् कांहींच न जमलं तर खुशाल एखाद्या कुशाळ कंपूच्या अड्ड्यावर जाऊन त्यांच्या अर्थशून्य आणि अनर्थकारी गप्पा-गोष्टींत भाग घ्यावा, असं त्याला वाटत होतं.

पण उपरोक्त शास्त्रांत वामन स्वतः तरी कुठं पूर्णावस्थेला पोंचला होता? मॅट्रिक झाल्यावर नोकरी मिळाली कीं आपण मनासारखं वाचन करून बुद्धिमंताच्या जगांत आपलं स्थान कायम करूं. केवळ विद्यालयीन गणवेषांतच बुद्धीचा विकास होतो असं नव्हे तर घरीं बसून देखील विविध प्रकारच्या वाचनानं जगांतील आणि जगाच्या घटनांची उत्पत्तीची न् विलयाची सुबुद्ध जाणीव हस्तगत करतां येईल, सारं वाङ्मयभांडार नजरेच्या टप्प्यांत आणतां येईल आणि आपल्याहि निर्मितीचा फुलोरा त्या रसैश्वर्याच्या प्रांतांत फुलवितां येईल अशी त्याची कल्पना! त्या भरांत त्यानं एक दोन गोष्टीहि खरडल्या. मित्रांना दाखविल्या. स्तुतीच उत्तेजन अनुभवलं. प्रथम प्रथम थोडी झीज सोसून आवडीचीं पुस्तकंहि आणविलीं. तीं पुस्तकं आतां कुठं तरी धूळ खात पडलीं होतीं. आणि त्याच्या नायिका प्रकाश विन्मुख आणि विस्मृत होऊन गडप झाल्या होत्या.

निदान कुटाळी करायला आसपासच्या जीवनाचं निरीक्षण करून कुत्सित बुद्धि तरी त्याला जोपासतां आली होती कां?

दुसरा एक सम व्यवसायी त्याच्यापुढं आला. पण जाऊन बसायला तेंहि ठिकाण योग्य नव्हतं. कारण त्याला तबल्याचा विलक्षण नाद होता. आणि वामनला ते वाद्य मुळींच आवडत नव्हतं. तो मित्र केव्हां केव्हां मुद्दाम रजा घेऊन आपल्या बैठकींत तबला वाजवीत रमतो हे वामनला माहीत होतं. त्या ध्वनि प्रतिध्वनींत जीवनांतलं असुख विसरून जाण्याचीं कांहीं अपूर्व कला त्याला अवगत होती. तिकडं पोरं रडत असलीं तरी हिकडं याचा 'धुमार' खुशाल चालत होता. त्याची बायको वारली तो प्रसंग आणि त्या प्रसंगानं विध्वंसिलेलं जीवन ...... सामान्य संसार! घरांत तीन चार कोवळीं पोरं. मिळकत यथातथाच म्हणून द्वितीय संबंधाची आशा नाहीं. तबलजी मित्राच्या डोळ्यांत आश्रूचा थेंबहि आला नाहीं. घरांतली रडारड आणि सहानुभावाचीं प्रदर्शनं थांबल्यावर एकान्त पाहून त्यानं तबला काढला. शेजाऱ्यांनीं त्याला कदाचित् वेड्यांत नाहीं तर मूर्खांत काढलं असेल, पण ध,न,त,च्या मुखडे आणि पलटे यांच्या मिश्रणांतून जे नादब्रह्म निर्माण झालं त्यांत कित्येक ब्रह्म विराम पावलीं असावीं. विधीचाच लोप झाल्यावर सुतक आणि तज्जन्य विकलता कुठली? त्याचं तें कुंभ ताडण कितीही कौशल्याचं असलं तरी वामनच्या आतांच्या मनःस्थितीला मानवणार नव्हतं!

रस्त्यावरून उगीच इकडं तिकडं फिरण्यांत कांहीं अर्थ नव्हता.

कारण गेल्या महिन्यांतल्या मिळकतीतून कांहीं उधारीवाल्यांचीं तोंड बंद करतां आलीं नव्हतीं. आतांच्या समाधानाला त्यांच्या हटकण्याचा अपशकून नको होता. पुढून पोस्टमन् येतांना दिसत होता. वयाच्या वेगवेगळ्या अवस्थेत पोस्टमनच्या प्रतीक्षेचींहि वेगवेगळी कारणं असावीं. विद्यार्थी दशेत पोस्टमन् घरून येणाऱ्या मनिऑर्डरसाठीं हवा असतो. प्रौढ वयांत वामन सारख्याला त्याची प्रतीक्षा करून कांहीं लाभ नसतो. दूर गांवीं शिकायला असलेल्या एकाद्या नातलगाचं पैसे पाठविण्यासाठी तगादा करणारं त्याचं पत्र तो आणून टाकतो आणि नसती काळजी उत्पन्न करतो. उतरत्या वयांत हीं भौतिक पत्रं उपयोगी पडत नाहींत. कादंबऱ्यातून फिरणारी पोस्टमनची जात तर कांहीं निराळीच असते. एकाद्या तरूणाच्या हातात खुशाल तो एकादं भरभक्कम रकमेचं मनिऑर्डर देतो नाहींतर उराशी बाळगतां येईल असं एकादं प्रेम पत्र आणून टाकतो. सुटीच्या सुखांत भर पडेल असं एकादं पत्र वामनला देण्यासाटीं त्याच्या पोतडीत असेल काय !

बाजूच्या न्यूज एजन्टाच्या दुकानांत ताज्या वर्तमानपत्राची वाट पहात बसलेला तो फुकटा वाचक वामनच्या चांगल्या परिचयाचा होता. जगातल्या राजकीय उलाढाली, निसर्गाचे उत्पात, बाजार भाव, आणि विचार प्रवाह त्याला माहित होते. वर्तमानपत्र यावयाला बराच अवधी असला तरी तें सर्वांच्या अगोदर आपल्याला वाचायला मिळावं म्हणून स्वारी एव्हापासूनच बैठक मारून होती. चेहऱ्यावरलं औत्सुक्य काय विचारतां ! जणूं आजच्या वर्तमानपत्रांत हिमालय

ढळून हिंदी महासागरांत बुडाला असल्याची बातमी असावी. उत्तर ध्रुवाचं टोक प्रचंड वेगानं फिरून दक्षिण ध्रुवाला लागणार असल्याचं भविष्यकथन असावं, आफ्रिकेच्या अरण्यांतून कांहीं राजकीय उत्पात करणारे विचारप्रवाह सुरूं झाल्याचं वर्तमान असावं, त्यांत इतिहास आणि वर्तमान गडप होऊन जात असावे, त्यांची संगती लावण्यासाठीं नाहीं तर आरंभ पाहण्यासाठीं किंवा शेवट कसा होणार याचं भाकीत करण्यासाठीं तो वाचक उत्सुक असावा. त्याचा सर्व जीवन क्रम वामनला माहीत होता. जेवण एका ठिकाणीं. निद्रा दुसऱ्या घरीं. नित्योपयोगी सामान ठेवण्यासाठीं कुठल्याशा मंदिरांतली एक खोली मिळालेली. संसार नसला तरी सारे सुखोपभोग कवडीचाहि खर्च न लागतां लाभलेले. मग जगांतल्या चांभार चौकश्या करण्याखेरीज दुसरं वेळ घालवायला कोणतं साधन होतं? कोणत्या साधनासाठीं खटपट करण्याची अवश्यकता होती?

रस्त्यावरचा गजबजाटहि विविध प्रकारचा होता. कुणी डॉक्टरकडं निघाला होता. त्या रस्त्यावर जे दोन तीन दवाखाने होते ते रोग्यांनीं न् रोग्यांच्या चिंतातुर नातलगांनीं चिकार भरून गेले होते. रोग्यापेक्षां नातलगांनाच शक्य तितकं अधिक पिळून हा डॉक्टर वर्ग मग्न होत होता. गाडी गांठण्यासाठीं पायी नाहीं तर वाहनांतून धावणारा मोठा समुदाय त्या रस्त्यावरून हलत होता. सुटी पाहून बाजारहाट करण्यासाठीं विभावतींत वेगवेगळ्या रस्त्यावरून जो नोकरवर्ग बाहेर पडला असला पाहिजे त्याचा थोडा अंश या रस्त्यावरहि होता. ज्वारी, तांदूळ, गहूं यांच्या भावांतली बारकाई पाहून

किफायतीनं माल घेण्याची, अर्थात् पुढच्या मुटीपर्यंत किमान पैशांत जगण्याची ती धडपडच नव्हती तर काय? या भुकेकंगालांच्या झुंडीकडं पाहून वामनचं समाधान होणं शक्य नव्हतं.

हिकडच्या भागांत बरीच पडझड होत होती. नगराच्या पुनर्रचनेची ती तयारी होती. पडत आलेल्या जुन्या घरांच्या ठिकाणीं नवी नव्या पद्धतींची घरं उभी करण्यांत येणार होतीं. निरुंद रस्ते उखडले जाऊन विस्तृत रस्त्याच्या योजना आंखल्या गेल्या होत्या. ही टाऊन् प्लॅनिंग स्कीम ज्यांनीं काढली आणि ती जे राबवूं लागले त्यांचं नेहमींचं राहणं राज रस्त्यावर आणि टुमदार घरांत असावं. आपण ज्या घरांत राहतो आणि ज्या रस्त्यावर फिरतो तशीच घरं आणि रस्ते इतर माणसासाठीं असावे ही इच्छा उदात्त खरी! पण गल्ल्या आणि बोळ काढून टाकले तर घरांत कित्येकांना फाशी घेण्याची वेळ येईल ह्याची त्यांना काय कल्पना? उधारीवाल्यापासून तोंड चुकविण्यासाठीं बोळाखेरीज आणखी कोणत्या रस्त्यानं माणसाला पसार होतां येईल? दीड आण्याचं सर्पण आणि तत्सम इतर क्षुद्र पण तात्पुरत्या अडलेल्या संसारांतील महदुपयोगी वस्तू आर्थिक टंचाईला तोंड देत असलेल्या सभ्य पोशाखी माणसानं खरेदी करून काय चोवीस फूट रुंदीच्या डांबरी सडकेवरून न्यावयाच्या? अभिसारासाठीं राज रस्त्यावरून निघणं कादंबरींत नाहीं तर काव्यांतच शोभून दिसेल. प्रत्यक्षांत ठिकठिकाणीं पोलीस उभे असतात. बारा वाजेपर्यंत रस्त्यावर झगमगीत दिवे जळत असतात. आणि नंतर दिव्यावाचून सहसा कुणाला रस्त्यावरून वावरतां येत नाहीं. केवळ

मीलनांतील आनंदाचा प्रकाश उपयोगी पडत नाहीं, गल्ल्या आणि बोळांतून मात्र बिनधोक पसार होता येत. प्रणयानुनय करायला ज्यांना रम्य उद्यानं नाहींत किंवा विस्तृत समुद्र किनारा नाहीं, प्रेम पत्र खरडण्यासाठीं साक्षरतेचा ज्यांना संपर्कहि नाहीं, अशा एकाद्या ग्राम्य तिलोत्तमेनं सुंदोपसुंदाशीं हमरस्त्यावर मंकेत नाहीं तर प्रेमालाप करावं ! दिवसाचा सुबक पोशाख उतरून ठेवल्यावर सभ्य-तेनं वामाचारासाठी कोणत्या अंधारातून अन् कोणत्या गल्लीत शिरावं? टाळके फोड, आणि दंगे धोप्यांच्या चालनेसाठीं सभा, संकेत किंवा संस्कार करून एकाद्या राष्ट्रानं आपली युद्धशीलता गल्ल्या आणि बोळाखेरीज आणखीं कोणत्या प्रांगणांत जाहीर करावी ! बोळांच्या निर्मूलनाबरोबर कित्येक सारंग्याच्या तारा तोडाव्या लागतील, कित्येक तबले फोडून फेकावे लागतील, एवढंच नव्हे तर उत्तान तशा गूढ रम्य सुखास्वादी अधारपुरीचे राजरस्तेच बंद केल्यासारखे होतील ! वामन त्या गल्लीच्या दुसऱ्या टोकाला निघाला तों तेथल्या एकेक दृश्याचे मनावर झालेले संस्कार पुनःपुन्हा गमतीनं उलगडून पहात ! निर्बंध आणि मुक्त मनानं वेश्यांच्या गल्लींतून फिरणं ही गोष्ट गम-तीची असेल, पण गमती खातर फिरताना अशा ठिकाणीं आपणास कुणी पाहणार नाहीं ना ही ज्याच्या मनांत धास्ती होती त्यानं वास्तविक ह्या मार्गावर प्रवेश न करायला पाहिजे होता !

वामनचीं पाऊलं आतां तर कचेरीकडं वळली होतीं, हा एक चमत्कारच नव्हता तर काय ? एकाहि मधलोबानं त्याला निमंत्रण केलं नव्हतं. पण सुटीच्या दिवशी हटकून बोलावणाऱ्या त्या खोडसाळ

वृत्तीचा त्याला अपमान करावयाचा होता. तो आपण होऊन तिकडे वळला होता हीच त्या अपमानाची क्रिया होती ! आणि सुटीच्या दिवशीं कुणींहि न बोलावतां एखादी सहज चक्कर करण्यांत गंमत नव्हती तर काय ?

दहाला खेंचून नेणाऱ्या आणि सहापर्यंत डांबून ठेवणाऱ्या त्या कर्मभूमीच्या आवारांत वामननं पाऊल टाकलं तो तिथं सारा शुकशुकाट होता. रहीम नांवाचा रातपाळीचा चपराशी जवळच्या झाडाच्या फांद्या तोडीत होता. सर्पणासारख्या सामान्य गोष्टीपासून लभ्य होतील तेवढया गोष्टी विनामुल्य मिळविण्याचा त्याचा क्रम फार पूर्वीपासून होता. 'कुंपण शेत खाऊन जातं' ह्या म्हणींतला अर्थ रहीमच्या रखवालींतून प्रत्ययाला येत होता. ऑफिसमध्यें चुकुन एखाद्याची वस्तू विसरून राहिली अन ही गडप झाली नाहीं तर चोरबाजारांत जाऊन पडली असं निःशंक मानावं आणि गप बसावं ! विचारपूस झाली तर रहीमच्या नम्र वाणींतला अभिप्राय असे कीं, पोलीसच्या पहाऱ्यांत दगोडे पडल्याचीं शेंकडो उदाहरणं दाखवून देतां येतील पण रहीमच्या पहाऱ्यांतून 'चिटपाखरूं' हलूं शकत नव्हतं !

वामन आंत जाऊन आपल्या खुर्चीवर बसला. तो ज्या शाखेंत काम करीत होता तिच्या मुख्याची खुर्ची रिकामी होती आणि इतरत्र सारा शुकशुकाट होता. खुर्च्या म्हणजे एकजात एकाच लाकडाच्या आणि बहुधा एकाच हातानं घडविलेल्या. पण माणसाच्या संपर्कात त्यांतहि केवढे भेदाभेद झालेले ! आपली खुर्ची सोडून

दुसऱ्या खुर्चीवर बसायचं नाहीं, अशी एक नवीच नीती त्या लहानशा क्षेत्रांत प्रसूत झाली होती.

नौकरीवर रुजू केल्याचा मोठ्या साहेबाकडून हुकूम आणून वामननं प्रथम ह्याच खुर्चीवर आसन केलं होतं. आणि आजूबाजूला गांगरलेल्या नजरेनं पाहिलं होतं. नौकरी मिळाल्यामुळं मनाला स्थैर्य आणि आनंदाचा लाभ झाला होता. पहिला पगार त्यानं ह्याच खुर्चीवरून घेतला होता. त्यावेळचा त्याचा झोकहि निराळा होता. त्याच्यापूर्वी झालेल्या कित्येकांचे पेन्शनचे तख्ते कसलाहि डाग अथवा डाख न लागतां तेथून मंजूर झालेलें असावे. मॅट्रिकच्या साच्यांतून भराभर बाहेर फेकलेल्या लक्षावधी अज्ञात नजरा आतां ती खुर्ची केव्हां रिकामी होईल याची वाट पहात असाव्या. गुन्हेगाराला भर चव्हाट्यावर फाशी द्यावयाची पुर्वी पद्धत असे. विद्येचा बाजार मांडून आणि वेगवेगळ्या पदव्यांचे छापे मारून विद्यार्थी जेथून बाहेर फेकले जातात त्या इमारतींच्या फाटकापुढं वामनचं एकादं चित्र लावलं तर तीस रुपड्यांची भिकार नौकरी करणाऱ्या माणसाचे काय हाल होतात हें उद्याच्या जगालां दिसून आलं असतं? ती पलीकडं जी खुर्ची होती त्यावर एक नररत्न बसत होतं. त्रिलिंग देशातल्या कोणत्या नामशेष सम्राटाच्या कुलातील ते असेल तें असो. पूर्वैश्वर्याची खूण म्हणजे सध्याचा पगार शंभराजवळ सरकत चाललेला! नांव नायडू साहेब. कधी काळीं एक दयाळू फिरंगी अधिकारी होऊन गेला होता. त्याच्या मेहरबानगीनं सही करण्यापुरतं ज्यांना साक्षरत्व चिकटलं आहे अशी पिढी तिसऱ्या ग्रेडमध्यें आणि तिसऱ्या ग्रेड-

मधला टाकाऊ माल दुसऱ्या ग्रेडमध्यें जबरीनं भरला गेला होता. त्यापैकीं बराच मोठा वर्ग पेन्शनवर अलाहिदा केला गेला होता. आणि पेन्शनच्या टप्प्याजवळ वयाचा गाडा ज्यांनीं ढकलीत आणला होता त्यापैकीं नायडू साहेब होते. साडे अकरा होऊन जिकडं तिकडं कामाचा उपसा चालूं झाला म्हणजे नायडू साहेबांची स्वारी कचेरीच्या दारांत अवतरलेली दिसायची. आणि औषध आणलं कां ह्याची आपल्या चपराशाजवळ चौकशी करायचे. दोन रिकाम्या बाटल्या दररोज चपराशानं सरकारी दवाखान्यांतून भरून आणाव्या असा गेल्या चार वर्षांपासून क्रम होता. बाटल्यांचं प्रयोजन एकाद्यानं त्यांना विचारलं तर 'घरची' आणि त्यांची प्रकृती दुरुस्त नसल्याचं तें सांगत असत. एवढा काळ लोटला होता. दवाखान्यांतल्या रजिस्टरांत रोजच्या रोज दोन ओळी वाढत आल्या होत्या. तरी नायडू साहेबांचा रोग मात्र हटत नव्हता! औषधाच्या चौकशीचा क्रम आटोपला कीं हाताखालच्या कारकुनांनीं शिजवून ठेवलेल्या फायली आपल्या सहीनिशी ते साहेबाकडं पाठवायचे. आलाच तसा एकादा करडा साहेब तर आजाराचं निमित्त सांगायला औषधाची बाटली तयार! साहेबाकडं जातांना अंगांत थोडंसं कापरं चढलं कीं तें आजाराचं नाहीं असं म्हणायची कुणाची छाती होती? तो आनंद त्यांच्या पुरतांच असता तर हरकत नव्हती. पण अमक्या कारकुनाबद्दल साहेबानं विचारलं, अशी गरम बातमी झोकून एकाद्या जिवाला ते घायाळ करायचे. नाहीं तर दिलासा द्यावयाचे. एकाद्याची बदली झाली कीं त्याला निरोप देण्यासाठीं चंदा जमा व्हावयाचा. हार, तुरे,

मिठाईच्या टोपल्या आणल्या जायच्या. या समारंभांत नायडू साहेबांचा झोक काय विचारतां! एक जुनाट उनी कापडासारखा दिसणारा सूट घालून ते येत. एकटेच म्हणतां कीं काय? दोन लहान मुलीं आणि एक मुलगा बरोबर घेऊन! इष्टमित्रांच्या परिवारासह आल्याशिवाय त्या समारंभाला शोभा येणं शक्यच नव्हतं! अशा समारंभांतून ते परत वळले कीं हलवायाचं एक चतुर्थांश दुकान त्यांनीं आपल्या खिशांत कोंबलं आहे असं खुशाल समजावं. प्रसंग आणि परिस्थिति आली कीं मात्र ही अधमवृत्ती एकाद्या कारकुनाचे बारा वाजविल्याशिवाय रहात नव्हती!

हिकडच्या बाजूला बसणारी वल्ली म्हणजे ठाकूर महाशय. ते एका लढाऊ घराण्यांतले होते. रक्त पात करणारे पूर्वज इतिहास जमा झाले होते आणि त्यांचा वंशज आतां निळी आणि लालशाई कागदावर उधळीत होता. आपल्या पूर्वजांच्या मोठेपणाच्या गोष्टी इतरांना सांगताना त्यांचा गळा भरून आल्या शिवाय रहात नव्हता. नौकरी सारखं दास्यत्वाचं जीवन एवढा स्वाभिमान बाळगून जगायचं म्हणजे कांहीं सामान्य गोष्ट नव्हती. खुशामत, आपल्या स्वभावात नाहीं असं ठाकूर मोठ्या अभिमानानं बोलून दाखवीत असे! 'भीक मागून पोट भरीन' हें सांगतांना त्याची चर्या तर कांहीं विशेष तेजानं झळकलेली दिसे. कांहीं द्वेषमूलक भावनांतून एकदां एक किटाळ अंगावर आलं. यथास्थित प्रकरण शिजवून रिपोर्ट होण्याची वेळ आली. कांहींना वाटलं संपला आतां ठाकूर महाशयांचा अवतार! ठाकूरही गर्जत होता 'नौकरीची पर्वा करणारा माणूस मी नाहीं'!

दुसरा दिवस उजाडला तेव्हा ठाकूर महाशय आपल्या दोन लहान मुलांसह साहेबाच्या दारावर उभे असलेले कांहींनीं पाहिले होते. घराण्याचा अभिमान ढळला होता. आणि साहेबाला द्रव यावा म्हणून त्यांच्या पायावर घालण्यासाठीं आपलीं दोन लहान मुलं त्यानं आणलीं होतीं! लहान मुलांचा आणखी चांगला उपयोग काय होणार होता? ‘मी मुलाबाळांचा धनी आहे’ हा शब्दसमूहच इतक्या असीम शरणांगतीचा होता कीं, एकाद्या जहाल अधिकाऱ्याच्या मनांत चटकन् करुणा उत्पन्न व्हावी! ठाकूर सारखं एकादं किटाळ घेऊन उद्या आपली नोकरी सुटली तर......हा प्रश्न वामनच्या मनांत आला मात्र! आजच्या आनंदाची त्याची निशा तत्काळ उतरल्यासारखी झाली कीं काय नकळे! त्यानं त्या स्थानाचा एकदम त्याग केला!......

# भाग दुसरा

— २ —

★

आतां रात्र झाली होती!

दिवस उगवला होता. आणि दिवसानंतर रात्र आली होती. पळापळाचे पदन्यास टाकीत कालनर्तिकेनं रात्रीच्या मिषानं नवाच मुरका मारला होता, असंहि म्हणायला कांहीं हरकत नव्हती.

विभावती नगरीतल्या त्या पांच रुपये भाड्याच्या खोपटांत सकाळी आढळली तशीच आतांहि शांतता होती. पण त्या आणि ह्या वेळच्या शांततेंत फार फरक होता. पिठाच्या गिरणीची भकूभकू केव्हांच थांबली होती. हिमार्त आणि म्हणूनच स्वरुनशील झालेल्या लिंबाच्या झाडाचं दैन्य उघडं पाडायला वाऱ्याची एकहि बारीक झुळुक वहात नव्हती. एका भिकार आणि भुकार कुत्र्याचा आक्रोश चालला होता, तों ऐकूं येत होता. जवळ राहणारा एक सोनार उग्र

स्वरांचं पेटार वाजवीत अनन्वरत कांहीं तरी गात होता. आणि इकडे शेजारच्या एका घरांत एक कोवळं पोर विंचू चावल्यासारखं किंचाळत होतं.

वामननं आथरुणावर अंग टाकून डोळे मिटून घेतले होते.

प्रसंगशून्य आयुष्यांत विस्मयाला उत्तेजित करणाऱ्या कोणत्या उत्पातकारी घटना घडून जाणार होत्या? दिवस उगवला होता आणि दिवसानंतर रात्र आली होती, हीच एक अशी उत्पाताची घटना होती कीं जिच्यामुळं शकांच्या आणि सनांच्या मोजणींत भर पडून माणसाचं आयुष्य एका दिवसानं कमी झालं होतं! पळाचं, प्रहराचं, दिवसाचं आणि संवत्सराचं एकेक पीस न कळत गळून जात असतांनाहि 'भविष्यकाळ उज्वल आहे' हा भ्रम माणसाला सोडतां येत नाहीं! काय म्हणावं या माणसाला? ..

सुटीचा एक अपूर्व सोन्याचा दिवस उगवला होता. किंवा ज्याचा कित्येक दिवसापासून निजध्यास लागला होता, असं सुटीच्या दिवसाचं एक नखरेल फुलपाखरूं वामनच्या आयुष्याच्या एका शाखेवर बसलं होतं तें जसं अवचित आलं होतं तसं अकस्मात् नाहींसं झालं होतं. कित्येक दिवसांनीं सहज लाभलेला सुटीच्या दिवसाचा सुवर्णक्षण काळाच्या उदरांत गडप झाला होता. तो पुन्हा वर काढून जपून ठेऊं म्हटलं तर शक्य नव्हतं!

दिवस कचेरीत आणि रात्र घरांत घालवायाचा वामनचा जो नित्यक्रम होता तसाच आणि त्याच पद्धतीनं तो आजहि उरकला गेला होता. सुटीचा दिवस नेहमी पेक्षां निराळा घालवायचा म्हणजे

एखादी भारी किंमतीची मोटार घेऊन त्यानं एखाद्या तरुणीवर प्रेम करून आणि अखेरीस विवाहबद्ध होऊन 'राजाराम' करीत बसायचं होतं? कीं आणखी कांहीं करायला हवं होतं? नौकरांसाठीं एक 'कोडबुक' होतं त्यांतहि सुटीचा दिवस कसा घालवावा याविषयीं कांहीं नियम घालून दिले नव्हते!

स्थिती, गती आणि लय या निसर्गाच्या घटनाखेरीज उत्तेजित अथवा अशांत करणारे प्रसंग उद्भवणं शक्य नाहीं असं आयुष्य घालवायची संवय वामनच्या कणाकणांत, वृत्तींत आणि विचारांत अलीकडं भिनली होती ती निराळा जन्म घेतल्याशिवाय सुटणं शक्य नव्हतं. नाहीं तर सुटीचा एवढा मनासारखा दिवस उगवल्याची जाणीव होऊनही त्याचीं पावलं कचेरीकडं वळचीं नसतीं, किंवा तो तिकडं न्यावीं असं वाटलं नसतं!

कचेरींतून परतल्यावर कुठली तीव्र ओढ नव्हती किंवा आत्म विस्मृतीसाठीं एखादा निश्चित व्यवसाय नव्हता. म्हणून तो रस्त्या-वरच्या वर्तमानपत्रं विकणाऱ्यांच्या दुकानांत शिरला होता. जगांत काय चाललं आहे हें निदान कळायला तर पाहिजे होतं? कारकुनांच्या ग्रेडस् वाढविल्या, त्यांना राबवून घ्यावयाचा कालावधि कमी केला, किंवा त्यांना सतावणाऱ्या मधखोरांना सरकारनं उचलून फांसावर चढवलं, अशा स्वरूपाच्या वार्ता वर्तमानपत्रं वाहून आणणं शक्य नव्हतं. आठ तास कामाचीं अंडीं उबविणाऱ्या नौकर मंडळीखेरीज जगांत आणखी कांहीं उचापती करणारीं माणसं होतींच ना! त्यांच्या हालचाली गमतीखातर पहाण्यांत काय बिघडणार होतं?

तो फुकटा अधीर वाचक तिथंच होता. एक संपवून त्यानं दुसरं वर्तमानपत्र हातीं घेतलं होतं चेहऱ्यावर भावहि असे बदलत होते कीं जणूं कांहीं घटना त्यानं अंदाज केल्याप्रमाणंच नक्की घडल्या होत्या. आणि कांहीं तशा कां घडल्या होत्या याचं त्याला कोडं पडलं होतं!

जन्म आणि मृत्यू या दोन टोकापर्यंत जीवनांत जेवढं घडूं शकतं तेवढ्याचीं ताजीं वृत्तं त्यांत होतीं! अग्रभागी मल्या मोठ्या मथळ्याखालीं कांहीं देशभक्त फाशी जाणार असल्याची बातमी होती वर्तमानपत्रांत अलीकडं अशा अद्भुतरम्य बातम्या येत होत्या तर! अन् हें काय? एक आपल्या कैफियतींत म्हणत होता 'स्वातंत्र्य संग्रामांत लढतां लढतां मला मृत्यू लाभतो आहे हेंच माझ्या जीवनाचं सार्थक!' दुसऱ्याच्या जबानींत होतं, 'आयुष्य ज्यांना मोडून खायचं असतं ते मृत्यूला भितात! कारण जगण्याबद्दल त्यांची तृप्ती झालेली नसते! मी निर्भय आहे! माय देशासाठीं नवा जन्म घेण्याची संधी ह्या मृत्यूनं मला लाभते आहे ही केवढी समाधानाची गोष्ट!' भेटण्यासाठीं आलेल्या आपल्या मातेला तिसरा म्हणाला होता, 'आई! आपला मुलगा मानानं मरतो आहे ह्यांत तूं खरंच फार समाधान मानलं पाहिजे!'

काय एकेक भानगडी होत्या त्या! बातमी खरंच थरकवून टाकणारी होती. पण फांसावर चढा असं कोण म्हणत होतं त्यांना? फांसावर चढण्याची क्रिया अवघड असावी? एक खांब असावा. टोकाशीं असलेल्या दोरांत गळा अडकला कीं काम खलास!

गळ्याला तात लागल्यावर प्राण जाईपर्यंत मात्र थोडा बहुत त्रास होत असावा इतकंच !

कांहीं कां असेना कचेरीत खर्डेघाशी करण्यापेक्षां तो जीवन-क्रम (?) निराळा होता !

दुसऱ्या पानावरचा मालमसाला देखील नवा आणि निराळाच होता. पुष्टीकारक औषधांच्या आणि चित्रपटांच्या जाहिराती होत्या तशा पीक पाण्याच्या खबरबाता होत्या. कुणी तरी गर्भ श्रीमंत विला-यती पदवी घेऊन हिंदुस्थानांत परत आला होता. एखादी मोठ्या पगाराची सरकारी नौकरी त्याच्यासाठीं वाट पहात असावी! कुठ-ल्याशा एका लोक सेवक संस्थेला एका धनाढ्य माणसानं कित्येक हजार रुपयांची देणगी दिली होती. त्याचं चित्र छापलं होतं. तें काळंबेरं आणि शक्य तितकं भेसूर दिसत होतं. तें छापतांना हजारां-नीं मोजता येणाऱ्या रकमेचा आकडा पाहून संपादक किंवा जुळारी यांच्या डोळ्या पुढं अंधारी आली असावी न् काय ! रक्कम नाण्यांच्या स्वरुपांत खणखण वाजवून दिली असावी. नाहींतर शंभरा पासून सुरूं होणाऱ्या नोटांचीं पुडकीच्या पुडकीं त्यानं भिरकावलीं असतील शंभर रुपयांच्या नोटेचा रंग आणि छपाई वामन विसरून गेला होता. हजारांनीं रुपये मोजायचे आणि ते दान करायचे म्हणजे देणाराची छाती फुटून कशी गेली नव्हती. ?

खालच्या भागांत कुणाशीं कुणाचा तरी विवाह झाल्याची वार्ता होती. लग्नाचा नेहमीच जो गाजा वाजा करण्यांत येतो त्याचं काय कारण असावं ? विवाहितावर पुन्हां कुणी हक्क सांगू नये म्हणून ?

विवाहांत अभिनंदन करण्यासारखी बाब असते तरी कोणती ! 'महाशय ! झालं तुमचं लग्न ! आतां भोगीत रहा मुलां बाळांचं अन् दवा पाण्याचं सुख दुःख' असा गर्भित उपहास अभिनंदनांत नसेल कशावरून ? तो कदाचित प्रेमविवाह असावा. आणि त्यांत कसलाहि अडथळा आला नसेल. पण अडथळ्या वाचून प्रेम होऊं शकतात हें मात्र आश्चर्याचं होतं !......

मग स्नान, हॉटेलांत जेवण, वामकुक्षी असे कार्यक्रम यथानुक्रम पार पडले होते. पण त्यांत कांहीं तरी कमी अधिक झाल्याची जाणीव मात्र शिरली होती. तो सकाळीं घरांतून बाहेर पडला त्यावेळीं घरांत सुशांतता होती. त्याची कचेरींतून घरीं परत यावयाची जी नेहमीची वेळ असे त्यावेळीं घरांत तर धुमाकूळ चाललेला असायचा ! पण आज त्यावेळीं तर त्यापैकीं एकाहि हालचालीचा आवाज त्याच्या कानावर आदळत नव्हता. खात्रीनं त्या आवाजांनी त्याच्या विरूद्ध एकादा कट केला असावा ! तो हुडकून काढण्यासाठींच कीं काय घरभर त्यानं एक चक्कर केला होता.

धुणं वाळत घातलं जाण्याच्या शेवटच्या काठावर आईचं सोवळं तसंच दिसत होतं. तें एकाद्या राजमातेचं तिच्या ऐश्वर्याला नू मानमरातबाला शोभेल असं भारी रेशमी वस्त्र नव्हतं. वैधव्याचे विचित्र संस्कार झालेल्या, चुली पुढं जळत उरणाऱ्या आणि निराहार उपास तपासाचे देहदंड सोसणाऱ्या एका अन्नपूर्णेचं तें वस्त्र होतं ! संसार विमुक्त स्त्रिया ज्या रंगाचं नेसूं नेसतात त्याच रंगाचं तें होतं. पण मूळचा रंग विटून गेला होता. जीर्णतेवर सूड उगविण्या-

साठीं वेगवेगळया तऱ्हेनं केलेली शिवण त्यावर आढळत होती. 'म्हातारीचं सोवळं' हीच एक आदर युक्त भावना त्या वस्त्राविषयीं कायम होती. रोजचं जेवण आणि कुलाचाराच देवतांचे नैवेद्य त्या-योगे तयार होते, हीच एक अशी गोष्ट होती, पावित्र्याची कल्पना मनाला चटकन् स्पर्शून जावी!

तें देवघर! देवांचंहि स्वतंत्र अस्तित्व तिथं होतं किंवा देवांना अस्तित्वाचं स्वातंत्र्य बहाल करण्याची मानवी कल्पना, शास्त्रांच्या तार्किक आणि अनुभूतीवर आधारलेल्या मर्यादा आणि जडतेचे तट भेदून पुढं गेली होती. परंपरागत चालत आलेल्या देवतांच्यां कित्येक प्रतिमा त्या देव्हाऱ्यांत होत्या. वामननं त्यांना कधीं ताम्हनांत बुड-विलं नव्हतं. तें सारं कांहीं त्याची आईच पहात होती. विज्ञानानं ईश्वरी अस्तित्व खिळखिळं करून टाकलं असलं तरी शुद्ध स्नान, रेशमी वस्त्र, गंध आणि फुलांचे अलंकार घातलेले ते देव म्हातारीच्या नवसाला मात्र पावत होते! ईश्वर नाहीं असं मानलं तरी सर्वांचं चांगलं व्हावं अशा सदिच्छेला कांहीं तरी अर्थ होताच ना!

इकडं बायकोची एक फाटकी चोळी खुंटीवर लटकत होती. माहेरच्या मंडळीकडून मुलीचा ज्या योगे सत्कार होतो किंवा नव-ऱ्यानं बायकोला जन्मभर ज्या वस्तू पुरवाव्या लागतात त्यांपैकीं ती एक होती. आपल्या अस्तित्वाचं इतकं विलक्षण चिन्ह पाठीमागं ठेवून जाण्यांत त्याच्या बायकोला काय वाटलं होतं कुणास ठाऊक? ती कित्येक दिवसां पासून जीर्ण झाली होती. आणि धड होती तीच कांचोळी बायको रोज भिजवून वापरीत होती, हें वामनला माहित

होतं. 'अग सूनबाई, ओली चोळी घालु नवोस. मुलाला बघ ना खोकला आला आहे !' असं आई रोज सूनबाईला आर्जवून सांगत होती ! सूनबाईला तें ऐकुं जात होतं किंवा नाहीं, कळत नव्हतं. पण मुलाला मात्र तें ऐकायची संवय झाली होती. मुलानं तें ऐकावं असाहि धोरणी हेतू त्यांत होताच. एखादा नवा खण किंवा कपडा आणून टाकणं आवश्यक होतं. पण पगाराचे पैसे ज्या वेळी संपून जात होते नेमकी त्याच वेळीं, ती गोष्ट तीव्रतेनं पुढं येत होती आणि मग एक तरी चोळी आहेना वापरायला अशा हिशेबी धोरणांत ती मागं पडत होती ! त्या फेकुन दिलेल्या वस्त्रानं अलीकडं कंदिलाची काच उजळली जात होती. जरी पटक्याची कामांगनेला कांचोळी केल्याचे कुणा एका पश्चाताप दग्ध छत्रपतीचे एका नाटकांतले उद्गार वामनला आठवत होते. कुलवतीच्या जीर्ण कांचोळीनं कंदिलाचं काजळ नाहींसं केलं जात होतं. पण नवऱ्याच्या कर्तृत्वावर ती काजळ फांशात होती कीं काय !

ओसरीवर त्या एका कोंपऱ्यांत बसून त्याची बहीण प्रति प्रभातीं सौभाग्याचीं आरक्त चिन्हं उजळीत होती. अरुणोदय झाला किंवा नाही हें पाहण्यासाठीं माणूस आकाशाच्या एका विशिष्ट भागावर नजर फेकतो, तसं वामननं त्या जागेकडे पाहिलं होतं.

कुटुंब वत्सलांच्या घरांत नेहमी हालत राहणारी वस्तु म्हणजे हा पाळणा ! विचारवंत म्हणत होते, पाळण्याची दोरी हातीं धरणाऱ्याच जगाच्या खऱ्या उद्धारकर्त्या असतात ! ते कोणत्या अर्थानं असेल तें असो ! रडक्या आणि चिडक्या मुलाला थोपटून निजवायचं

तें एक साधन होतं. आणि तो हालू लागला कीं प्रपंचांतल्या ओढाताणीला सुरवात होत होती! अांगणांतल्या एका कोपऱ्यांत त्याच्या धाकट्या भावाची एक तुटकी चप्पल त्यक्तावस्थेंत पडली होती. नवी पायतणं घेण्यासाठीं एक दोन वेळां त्यानं वामनला नम्रतेनं सांगितलं होतं. चपलांचे नवे सुबक जोड तो पाहून आला होता. आणि कॅन्व्हसचे बूट चपलापेक्षां टिकाऊ कसे असतात, हें वामनच्या मनावर ठसविण्याचा त्यानं प्रयत्न केला होता. कित्येक दिवस आहेत तींच पायतणं ढकलीत नेण्याची त्यानं शिकस्त केली होती आणि मग निकामी जोड बेधडक भिरकावून देऊन तो अनवाणी जात येत होता. वामनच्या अपुऱ्या संगोपनावर तो जणूं चिडला होता!

ओसरीवरच्या एका खुंटीवर त्याच्या भाच्यांच्या शाळेत न्यावयाच्या पिशव्या लटकत होत्या. त्या मळून गेल्या होत्या तशा शाईच्या चित्रविचित्र डागांत रंगीबेरंगी दिसत होत्या. त्यांत नुसतीं पुस्तकंच असतील हें खात्रीनं सांगतां येत नव्हतं. विश्वाची ज्यानं घटना केली त्याच्या जादूच्या पोतडींत नसतील एवढ्या त्यांत वस्तू असल्या पाहिजेत. किंवा निकामीं म्हणून फेकून दिलेल्या घरांतील चिल्लर वस्तूंचा तो अजबखानाच नव्हता तर काय! शहाण्या माणसांनीं वापरून ज्यांची निरुपयुक्त अवस्था केली होती नेमक्या त्या व तशाच वस्तू त्यांनीं आपल्या थैल्यांतून जमवून ठेवल्या होत्या. एखाद्या संग्रहशील धोरणी शक्तीनं खात्रीनं त्यांचे कान फुंकले असावे! सुज्ञान दशेवर किंवा शहाणपणावर एवढा प्रखर आघात

मुलं करूं शकतात हें आश्चर्य होतं! वामन रात्रीं जेवण्यासाठी आला कीं धूर ओकणाऱ्या चिमणीच्या उजेडांत त्यांचं लघुतम दृढ-भाजक चाले. नद्याची नामावली पाठ करणं सुरू होई. थोरामोठ्यांचीं पुस्तकांतलीं चित्रं त्या बेधडक काळीं करून टाकीत. किंवा धर्मा-धर्माचा विचारहि न करतां वाटेल त्याला कुंकवाचे टिळे ठोकून देत. सूपशास्त्रांतले शाब्दिक प्रयोग सुरू होत. नाहीं तर कागदांची खेंचा-खेच करून भांडत आणि भोकाड पसरीत!

आज त्या पिशव्या शांत आणि स्थिर होत्या. तशाच स्वरू-पाचं स्थैर्य आसपासच्या सगळ्याच वस्तूंवर पसरलं होतं. त्या प्रत्येक वस्तूला हालचालीचा जिवंतपणा आणणारे त्यांचे धनी परगांवीं गेले होते. मस्ती करणाऱ्या मुलाला थोबाडींत मारून कोपऱ्यांत बसवावं, तशा कोंडलेल्या उद्गारानं तेथली प्रत्येक वस्तू तुंबल्यासारखी दिसत होती. ज्या ठिकाणीं लिंबाचं निष्पर्ण होत चाललेलं झाड आहे. पिठाच्या गिरणीचाहि जिथं आवाज होत नाहीं, एक भुंकेल श्वान मात्र भर रस्त्यावर निवांतपणीं वस्तीच्या नांवानं रडतं आहे, अशा नीरव स्मशानांत तर आपण बसलों नाहीं ना असं त्याला वाटूं लागलं होतं! रोजचे नानाविध आवाज त्याच्या स्मृतींत रुतले होते. त्या आवाजांत जगण्याची त्याला संवय लागली होती. ते आवाज करणारी मंडळी म्हणजे त्याच्या जीवनाचा अंश झाली होती. एखाद्या फुटक्या पेटीतून सुस्वरा ऐवजी नुसता भस् भस् वारा व्हावा, तशीच आजची त्याची श्वसन क्रिया होती. 'ओरडा आदळा, गोंधळ करा,' असं प्रत्येक वस्तूनं टाहो फोडून सांगावं असं त्याच्या मनांत येत

होतं. काय चमत्कारिक शांतता ती! केवढा प्रचंड तो शांततेचा कल्लोळ! आकाशाचं ऊर खात्रीनं त्या चमत्कारिक गडद शांततेनं फुटून जाणार होतं! त्या शांततेच्या कल्लोळानं कानठळ्या बसत नव्हत्या तर काय! खरं म्हणजे सुटीच यावयाला नको होती. खुशाल घरांतून कचेरीला आणि कचेरीतून घरीं, चकरा मारीत रहावं, डोकं वर करतां येणार नाहीं असा भला मोठा दगड मानेवर टेवून घेऊन कचेरीतल्या कागदाच्या नकला मागून नकला कराव्या, पण हें अस्थिर, शून्य, मनाला घरं करणारं अशांत शांतीचं विलक्षण रिकामपण नको असं त्याचं झालं होतं.

आणि मग आंथरुणावर अंग टाकून डोळे मिटल्यावर दिवसभर पाहिलेल्या दृश्यांच्या संस्कारांनीं, त्यांतून उद्भवलेल्या विचार विकारांनीं एकदम त्याला जाग आली. वयाच्या तिसाव्या वर्षाचा, सांसारिक चिंतांनीं शेवाळलेला आणि अनिश्चितीच्या नुसत्या विचारानंहि डळमळणारा चौथरा त्यानं सोडला. आणि तो सरळ धांवत निघाला तों थेट 'गोकुळदास बिल्डिंग' पर्यंत !..........

——'गोकुळदास बिल्डिंग' किंवा नुसतं 'गोकुळ' म्हटलं कीं राजनगरची भर रस्त्यावरली ती! मजली भरभक्कम इमारत डोळ्यापुढं येत होती. राजनगरच्या स्टेशन बाहेर पडलेले विद्यार्थी उतारू एकाद्या तांग्यात बसले कीं, 'कुठं?' असं विचारायची तांगेवाला फिकीर करीत नव्हता. कारण राजनगरला आलेला विद्यार्थी सहसा गोकुळा खेरीज इतरत्र जात नव्हता. त्या भागांत बटवडा करणाऱ्या पोस्टाच्या शिपायाजवळ गोकुळ्याच्या पत्त्यावर आलेल्या

पत्रे आणि मनिऑर्डरीसाठीं एक स्वतंत्र शैली असे. तेथल्या 'ज्ञान-वर्धन' नांवाच्या सुप्रसिद्ध शिक्षण संस्थेतल्या एखाद्या वर्गात थोडासा उनाड आणि वात्रट विद्यार्थी आढळला कीं, मास्तर विचारीत होते, 'तुम्ही गोकुळात राहतां वाटतं ?' आणि गोकुळात राहिल्या खेरीज उनाडकी आणि वात्रटपणा अंगी येत नाहीं. (किंवा गोकुळातलेच विद्यार्थी उनाड आणि वात्रट असतात.) अशा अर्थाची त्या प्रश्नातली खोंच हास्याच्या गडगडाटात वाहून जात होती ! राजकीय विचारांची गडगड जरा कुठं राजनगरात ऐकू आली कीं, तेथलं उघडं आणि छुपं पोलीस खातं आधीं गोकुळाचा कानोसा घेत होतं !

गांवांत ज्यांना राहण्याची नात्याची अथवा जागेची सोय नाहीं अशा परगांवच्या विद्यार्थ्यांनीं ती सबंध इमारत गजबजून गेली होती. सडा विद्यार्थी कुटुंबवत्सलांत आणि एखादं कुटुंब गोकुळांत टिकनील हें शक्य नव्हतं ! दोन जातींत अथवा पक्षांत असणार नाहीं इतकी तीव्र पण गुप्त तेढ राजनगरच्या नागरिकांत आणि गोकुळांतल्या विद्यार्थ्यांत होती ! पदव्यांच्या कासेला लागण्यासाठीं वेगवेगळ्या ठिकाणाहून एकत्र जमा झालेला कोंकरांचा तो अजब-खानाच होता ! छातीचं खोकं आणि डोक्याचं मडकं झालेला एक M.A. चा विद्यार्थी एकांतासाठीं तिसऱ्या ताळावर रहात होता L.L.B. च्यां टर्म्स भरीत बसलेल्या कांहीं उद्याच्या कायदे पंडि-तांचा तिथं भरणा वाढूं लागला होता. इंटर आणि बी. ए. आणि B. Sc. ची बिन् मिशाचीं पिढी गोकुळाच्या पायऱ्या तोऱ्यांत चढत होती आणि झोकांत उतरत होती. मॅट्रिकचा गळफास ज्यांनीं

आचके आणि उचके देत अखेर सोडविला होता, ते 'सरस्वतीचे लाडके लाल' 'लॉक्लास'चा अभ्यास-क्रम घेऊन दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करून रहात होते. आणि मॅट्रिकच्या आखाड्यांत उतरलेला आणि वाऱ्या करणारा वर्ग तर सर्वांत मोठा होता. ह्यांतलेंच गोकुळांत, कोवळे कवी होते, चांचपडत चालूं लागलेले तत्वज्ञ होते, कच्चे समाजकारणी आणि राजकारणी बच्चेहि होते!

मेपासून जूनपर्यंत ती इमारत निर्मनुष्य आणि भकास दिसे. जुलैच्या ढगांचा आभाळांत गडगडाट सुरू झाला कीं गोकुळांत वर्दळ, भांडाभांडी संगीत आणि वादविवादाला ऊत येत होता. खोल्याखोल्यांच्या खिडक्या आणि दारांचा खाड खाड आवाज येत होता दिसतील तेवढे आजूबाजूचे देखावे टिपून घेतले जात होते. बिल्डिंग थोडीशी उंचावर असल्यामुळे आसपास राहणाऱ्या कुटुंबवत्सलांना उपद्रव होई. कित्येक कुलांगनाचं स्नान अडून बसे. उघड्या गच्चीवर एकादी उर्वशी नाहीं तर रंभा दिसली कीं उंच आवाजांत कविता गायल्या जात. नाहीं तर सौंदर्य रेखाचं मनोमन चिंतन सुरू होई.

रूम नंबर सदतीसच्या खिडकींतून एक निळं घर दिसत होतं. तें पाहण्यासाठींच ती उघडली जात होती. आणि ती उघडली गेली कीं आसपासच्या घरांत रंगभिन्नतेनं उठून दिसणारं तें निळं घर एकदम डोळ्यापुढं येत होत. घराला निळा रंग देण्याची काय आवड असेल ती असो. कोणत्या वयांत कोणते रंग आवडतात, ह्याचं एकादं शास्त्र असल्यास न कळे! रूम नंबर सदतीसच्या मालकाला मात्र तो रंग आवडला होता. आज फुलून उद्या शुष्क

होणारा गुलाबी रंग हा भौतिक रंग म्हणतां येईल. काळे पांढरे रंग हे मृत्यूच्या रंगदाणींतच शोभून दिसण्यासारखे! पण निळ्या रंगाचा निष्कलंक ताजेपणा कांहीं निराळाच! काळे भुरके मेघ जमतील. वीज आणि उल्का मर्त्येच्या हव्यासानं चमकतील आणि क्षणांत लुप्तप्राय होतील. धूळ आणि धुक्याचे थरावर थर चढतील. पण क्षणिकच तें! नीलिमा पुन्हां जशाचा तसाच!

अखंड प्रकाश आणि अनंत जीवन हेच ज्याचे गर्भ तो रंग कुणाला वेड लावणार नाहीं?

जवळच्या खोलींतल्या एकानं आपल्या जोडीदाराला विचारलं होतं,

'अरे ह्या निळ्या घरांत कोण राहतं?'

'माधवराव इन्जिनीयर!'

तिसऱ्यानं चर्या गंभीर करून म्हटलं होतं.

'मूर्ख आहेस! निळ्या घरांत माणसं राहतात हें सांगितलं कुणी तुला? नक्षत्रं असतात तिथं माहीत आहे? आणि त्यांचं रूप आणि गती पाहण्याची वेधशाळा तिकडे रूम नंबर सदतीसमध्यें आहे. असेल तेवढं धाडस तर जा आणि पहा!'

खोलीच्या दारावर खडूनं लिहिलेली 'वामन गोपाळ रांजणीकर' हीं ठळक अक्षरं पाहून त्या निळ्या घराच्या अधिक चौकशीसाठीं खोलीमध्यें जाण्याचं धाडस जिज्ञासूला होणं शक्य नव्हतं. कारण त्या खोलीचा मालक म्हणजे कांही सामान्य आसामी नव्हती. शहरी संस्कार झालेल्या एकाद्या नाजूक गोऱ्या गुलछब्बू पोरासारखा

तो दिसत नव्हता. कांहींसं रानवट धटिंगणाला शोभेल असं शरीर, आणि विशाल पाणीदार डोळे पाहिले कीं, भांडण विकत घेऊन तीं लढविणारी मुलं थोडीशी दुरूनच चालत होतीं. आणि शिक्षा करण्याचा प्रसंग एकाद्या मास्तरवर आला तर ही मूर्ती पाहून त्यांना थोडासा विचार करावा लागत होता.

तो सभ्याशीं सभ्य तसा गुंडगिरींतहि पुढं गेलेला होता. नानू नांवाचं एक बेरकी कारटं त्यावेळी हायस्कुलांत शिकत होतं. पदराला आलेल्या शाळकरी पोरींना गल्लींत गाठून त्यांचं चुंबन घ्यावयाचा त्याचा एक उपक्रम होता. मास्तर आणि मुलींच्या पालकांनीं सभ्यासभ्य जेवढे उपाय करतां येतील तेवढे केले. पण नानूची उनाडी तशीच चालू होती. तो कुठं दिसला कीं 'आला ग बाई नानू' असं म्हणून मुलींचा घोळका वाट दिसेल तिकडं उधळत होता. रूम नंबर सदतीस त्याच्या पाठलागाला निघाला. नानू दिसेल तिथं बडवून काढायचा असा तीन दिवस कार्यक्रम झाला. मग त्रस्त झालेल्या मुलींची एक यादी तयार केली आणि घरोघर त्याला फिरवून त्या त्या मुलीकडून पायतणाचे प्रहार करविले. नानू पुन्हां मात्र मुलींच्या वाटेला गेला नाहीं. उलट जातां येतां कधीं रूम नंबर सदतीस दिसला कीं सभ्यतेनं दोन्ही हात जुळवून म्हणत होता,

'नमस्ते रांजणीकर!'

एकदां एका रात्री रूम नंबर सदतीसची भाड्याची सायकल दिवा नाहीं म्हणून अडविली गेली. कुठं कुणी माणूस आजारी होता; डॉक्टरकडं धांवपळ करावी लागल्यामुळं दुकानदाराकडून दिवा

मागून घ्यावयाला अवसर नव्हता. एका माणसाचा जीव वाचवायचा होता, त्यासाठी रहदारीचे कायदे निदान अशा प्रसंगीं तरी बाजूला ठेवणं अवश्यक नव्हतं ? मग काय व्हायचं तेंच झालं! दुसऱ्या दिवशीं प्रत्येक विद्यार्थी आपल्याकडं निरखून कां पाहतों आहे हें त्या विभागांतल्या मार्गनियंत्रकाला मात्र समजलं नाहीं !

गणेशोत्सवाच्या धामधुमीचे दिवस होते. राजनगरांत पन्नास साठ गणेशोत्सव होत होते. शिवाय जमीनदार जहागीरदारांचे नीमसरकारी गणपती वेगळेच. गोकुळाजवळ बलभीम आखाड्यांतल्या कांहीं मंडळीकडून बालगणेशोत्सव नांवाखालीं श्रीची स्थापना, मेळा संवाद आरती व्याख्यानं आणि प्रसाद असा कार्यक्रम होत होता. उत्सवाच्या पहिल्या दिवशीं कार्यक्रम चालू असतां दाराबाहेर बाचाबाची चालल्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. गोकुळांतल्या एका विद्यार्थ्याला प्रवेश मिळत नाहीं अशी खबर आंत पोंचतांच सभास्थानीं एकच गडबड उडाली. आंत जमलेल्या गोकुळांतल्या विद्यार्थ्यांनीं चटकन् सभात्याग केला ! प्रकरण एवढ्यावरच थांबलं नाहीं. कांहीं विद्यार्थ्यांनीं प्रसादाच्या लालचीनं एका खोलींत गणपतीची स्थापना केली होती. तोच गोकुळाचा एकमेव गणपती समजला जाऊन कार्यक्रम आंखला गेला. व्याख्यात्यांची योजना होऊन पत्रिका वाटल्या गेल्या. रूम नंबर सदतीस गर्जून सांगूं लागला, ‘गोकुळांतला गणपती टिपऱ्या वाजवून दळुबाई सारखीं गाणीं म्हणण्यासाठीं नाहीं. रद्दड वक्त्यांना व्यासपीठावरून कांहीं तरी बरळूं देण्यासाठीं नाहीं. विचार जागृतीसाठीं त्याची प्रतिष्ठा आहे !’

दुसऱ्या दिवशीं, बालगणेशोत्सवाचं कार्यकारी मंडळ रोषनाई करून, पोरं जमवून आणि पेटी तबला लावून तयार बसलं होतं. पण एकहि जाणता प्रेक्षक तिकडं वळला नव्हता, कारण गोकुळांतल्या कार्यक्रमाचं आकर्षण कांहीं निराळंच होतं 'आजचे राजकीय विचार प्रवाह' अशा विषयापासून 'शेक्सपियरची नाटकं' असे विषयहि व्याख्यानांत होते.

प्रो. धीरभद्र ही शेक्सपीयरवर बोलणारी अधिकारी व्यक्ती समजली गेली होती. मॅट्रिकपासून वरच्या वर्गांना शेक्सपीयरची नाटकं अभ्यास-क्रमांत असल्यामुळं पढिकांचा न् विद्यार्थ्यांचा त्या व्याख्यानाला फार मोठा समुदाय जमला होता.

अखेरच्या दिवशीं काव्यगायन होतं. तोहि कार्यक्रम असाच रंजक झाला होता.

गोविंद काकडे नांवाचा एक B. A. चा विद्यार्थी कवि म्हणून गोकुळांत आणि गोकुळाबाहेर प्रसिद्धी पावला होता. स्वतःसाठीं त्यानं एकहि टोपण नांव निवडलं नव्हतं. त्यांत कांहीं अर्थ नव्हता. कारण असं कीं, समजा एक मुलगी आहे; मुलगी म्हटली कीं देखणी आणि काकडेचं काव्य समजण्याइतकी श्रेष्ठ रसिकतेची; तिला माहीत आहे कीं गोविंद काकडे म्हणजे पोषाखीपणांत उच्चांक गाठलेला नम्र मिष्ट भाषणानं इम्प्रेशन पाडण्याचा प्रयत्न करणारा, आणि शिवाय कवि आहे, थोडक्यांत तो दिसतांच त्याला सांगावं, 'काकडे! मी तुमच्यावर मोहित झाले आहे. आहांत ना तुम्ही मग लग्नाला तयार?'

अशा परिस्थितींत टोपण नांवाचा कांहीं उपयोग होणार नव्हता. कारण ते एकाद्या परिचय करून देणाऱ्यांनं तिला सांगावं तेव्हां कुठं लख्ख प्रकाश पडणार! अन् परिचय करून देणारा तें तसं सांगेल, याची खात्री तरी देणार कोण!

काकडे असा होता. त्यानं टोपण नांव निवडलं नसलं तरी 'कवि अक्रुर' असं एक उपनांव इतरांनीं जबरीनं त्याच्यावर लादलं होतं. एक तर तो गोकुळांत रहात होता आणि 'अजि अक्रुर हा' ह्याच चालीवर किंवा वळणावर तो कविता गात होता. राजनगरच्या पुरंध्री सैरंध्रींची त्याच्या जवळ अद्यावत टिपणी होती. इंटर आणि बी. ए.तून कोण कोण पसार झाल्या त्यांचीं नांवं, रूप, वस्त्राप्रावरणाचे रंग आणि आवड इत्यादि गोष्टी त्याला तोंडपाठ होत्या. नागपूर मॅट्रिकला कोणत्या आणि किती मुली बसल्या आहेत याची त्याला चांगली माहिती होती. त्यांचा निकाल छापणारीं वर्तमानपत्रं पाहण्याची त्याच्या इतकी काळजी कुणालाहि नसेल! त्यापैकीं एकादी मुलगी रस्त्यावर भेटली कीं, तो एकाद्या मित्राला म्हणायचा,

'कार्टी पास झाली बरं कां? मी म्हटलं नव्हतं तुला ही निघणार म्हणून!'

अन् मग अशा कांहीं नजरेनं पहायचा कीं जणूं त्याला म्हणायचं होतं,

'हं, कसं काय, निघालात एकदाच्या परीक्षेतून! आतां उगीच वाट पहायला लावूं नका बुवा!'

त्याचे ओळख करून घ्यावयाचे प्रयत्न कधीं फसत असं मुळींच नव्हे. फसगत होत होती ती निराळ्या बाबतींत! विधिघटना म्हणून कांहीं तरी होती ना. गोविंद काकडेला ती झुकांड्या देत होती. तो ओळख करून घेत होता. जात येत होता. बोलत बसत होता. आणि एकूण असा आभास होत होता कीं नाजूक ओळखीचं पर्यवसान शुभमंगलांत होणार! पण काय! त्या वेंधळ्या वार्त्या कुणाचा तरी हात धरीत भोवल्यावर चढत होत्या. आणि 'Thus with a kiss I die' अशा रोमिओच्या अविर्भावांत काकडे निराश होऊन पडत होता. नाहीं तर मंगलाष्टकं रचून पुढं निदान दुरून ओळख कायम असावी म्हणून तीं गाऊन दाखवीत होता! असा एकहि विषय नव्हता कीं त्यानं ज्यावर कविता रचली नाहीं! गुलाब आणि कांटे हे सामान्य विषय! पण तिखट मीठावर देखील त्याच्या कांहीं काव्य पंक्ती होत होत्या! अशा या सर्व विषयग्राही कवीवर ऑर्लॅन्डोच्या थाटांत (From the East to western End) कांहीं शेक्स्पीयरचे मराठी शिष्य गात होते,

'फ्रॉम डेक्कन् टु खैबर विंड
नो पोयट् इज लाइक गोविंड्'

कवि अकुर काव्य गायनाला उठले तेव्हां टाळ्यांच्या कडकडाटांत त्यांचं स्वागत झालं, कविता नेहमीच्याच पद्धतींत पण थोडी जोसांत त्यांनीं म्हटली होती. कारण प्रेक्षकांत कांहीं शिष्ट पगड्या आणि टोप्याबरोबर शेपटेहि होते.

अक्रुर अखेर थंड झाला होता. मग कांहीं कुलीन कन्यका

उम्या राहून पदर सावरीत होत्या आणि कविता-गायनाच्या नांवा-खालीं कांहीं तरी कोवळे घाबरट सकंप स्वर काढून आपापल्या जागेवर जाऊन बसत होत्या.

लगेच आणखी एक लतिका उभी राहिली होती.

आणखी एकाद्या चांगल्या कवितेचं कडबोळं होणार होतं नू काय !

छे !

तिचा उभं राहण्याचा आवेशच असा कांहीं होता कीं, 'Hail Queen !' असं तिचं दरबारी स्वागत व्हावं ! किंवा 'Beauty' असा बॅडमिंटन्‌च्या खेळांत एकाद्या कुशल ठोक्याला (Shot) प्रेक्षकांतून अंतःस्फूर्त प्रशंसोद्‌गार निघतो, असा एकादा अर्थपूर्ण आणि प्रसंगोचित उद्‌गार निघावा !

आणि तेव्हां स्वरांचे प्राथमिक संगितानुकूल कंप घेत तिनं कविता म्हणायला आरंभ केला तो काय, सभा शांत आणि चित्रा-सारखी तटस्थ झाली !

प्रेक्षकांच्या कानावर सुस्वर पडत होते,

—'ध्येयव्रतांचे मंदिर जेथे
वाट सरावी अखेर तेथे;
त्रिभुवन ज्यांचीं गायिल गीते —

एक चष्मेवाला विद्यार्थी मंत्रमुग्ध होऊन बसला होता. विस्मयानं आणि श्रुतिसौख्यानं त्याच्या जिवणीचा 'आ' कार झाला होता. शेजारच्या मित्रानं त्याला सावध करून म्हटलं होतं,

'दाम्या! कविता खाऊन टाकण्याच्या बेतानंच बसल्या सारखा दिसतोस आहेस! तोंड मिट!'

दामू ओशाळला होता. त्याला समर्पक प्रत्युत्तर सुचलं नव्हतं. खिशांतलीं दस्ती काढून तोंड पुसण्याचा त्यानं चाळा केला होता आणि हलकेच विचारलं होतं,

'कोण रे ही?'

'कां? झालाय् कां नक्की विचार मागणी घालण्याचा? पण तोंड वासून सुंदर पोरी मिळवितां येत नसतात समजलास!'

इतक्यांत Silence please अशीं शांतता राखण्यासाठीं सभेच्या व्यवस्थापकानं सूचना केली होती. कवींचे आणि काव्य-गायिकांचे आभार मानले होते. तें मानले जातांना शेवटच्या मुलीचं नांव 'नीला तळशीकर' असं उच्चारलं गेलं होतं. तेवढ्यांत कुठल्याशा कोपऱ्यांतून आवाज आला होता 'अहो रांजणीकर नांव जरा मोठ्यानं उच्चारा आम्हाला ऐकूं आलं नाहीं!' 'नांव उच्चारा नव्हे घ्या' अशी दुसऱ्या एका आवाजांतून सूचना आली होती. आणि अखेर सभा बरखास्त झाली होती!

'एवढ्यावरहि ज्याचं कुतूहल पूर्ण झालं नव्हतं, त्यांच्यासाठीं कवि अक्रुराच्या टिपणीत सर्व वृत्तांत तयार होता. ती निळ्या घरांत राहणाऱ्या माधवराव इंजिनीयरची मुलगी. माधवराव तेथल्या p. w. खात्यांत सब इंजिनीयरच्या ग्रेडमध्यें होते. सकाळीं नऊ साडे नवाला गोकुळाजवळ जी बस थांबत होती आणि पोंगा वाजवीत होती, ती केवळ माधवरावांना कचेरीकडं घेऊन जाण्यासाठी आणि

आल्याची सूचना करण्यासाठीं! त्यांची 'कार्टी' ही नीला तळशीकर देखणी तशी हुशार. नागपूर मॅट्रिकला असलेली आणि रूम नंबर सदतीसच्या कक्षेंत फिरणारी!'

थोडी जान पछान झाली तरी पुरे या हेतूनं काकडेनं एकदा रूम नंबर सदतीसला एकीकडं गाठलं. हॉटेलांत चहा शिरा चारला आणि म्हटलं,

'रांजणीकर, आम्हाला घेऊन चला ना एकदां!'

'कुठं? राणीबागेंत कीं म्यूझियम् मध्यें?'

'नाहीं. तुमच्या त्या निळ्या घरांत!'

रांजणीकराला हंसू आल्याशिवाय राहिलें नाहीं, पण तें प्रगट न करतां त्यानें खिन्न चर्या करून म्हटलं,

'काय करावं काकडे, कांहीं निमित्तहि आढळत नाहीं— ठीक आलं लक्षांत! मी माधवरावांना विचारतो मुलीचं लग्न केव्हां करायचं म्हणून! म्हणजे अनायासे मंगलाष्टकं करून गावयाला तरी तुला तिथं यायला मिळेल!'

काकडे पुन्हां मात्र निळ्या घराविषयीं कांहीं बोलला नव्हता. उत्सव संपल्यावर दोन तीन दिवसानंतर निळ्या घरांत एक संवाद झाला होता,

'काय, संपला उत्सव?'

'हो! अविनाश दिसत नाहीं. दोन दिवस उत्सवानंतरच्या निरवा निरवीचं काम होतं म्हणून येणं झालं नाहीं. कुठं बाहेर गेला आहे कीं काय तो?'

'होय. मीच दिली परवानगी त्याला बाहेर जायला. म्हटलं मास्तर उत्सवाच्या गडबडीत थकले असतील. विश्रांती घ्या आणखी दोन दिवस चांगली! बसाना. घाई आहे?'

'नाहीं!'

'चहा सांगते बाईना मी!'

चहासाठीं सांगून नीला परत आली तेव्हां वामन म्हणाला,

'तुमच्या गायनानं आमच्या गोकुळाला भारून टाकलं आहे!'

'गोकूळच तें!'

'असं? उद्या गोपिकांची रस्त्यावर अडवणूक होऊन शेप-त्यांतले गुलाब घाबरून गळून पडू लागले म्हणजे?'

'तुम्ही आहांत ना मुलींच्या परित्राणासाठीं!'

'मला एकानं बांगडी बहाद्दर ठरविलं आहे!'

'ते कसं?'

म्हणे मुलींच्या रक्षणाचं कंकणच बांधलं आहे मी!'

जरा वेळानं वामननं म्हटलं,

'तुमच्या कविता-गायनानं मी मात्र खरंच वेडा झालों आहो बरं कां!'

'मोठी खेदाची गोष्ट आहे. कारण आमच्या अविनाशला दुसरा चांगला मास्तर... !'

'असं थट्टेवर घालवूं नका! तुम्ही म्हणलेली कविता तरी किती चांगली. अन् कवितेच्या प्रसिद्धीला हा मार्ग मोठा नवलपूर्ण

आहे. कवितेच्या पुस्तकाला विद्वत्तापूर्ण प्रस्तावना लिहून घेण्यापेक्षां सभांतून तुमच्याकडून त्या कविता गावून घ्याव्या. लक्षावधी प्रस्तावना न् परीक्षणं छापल्यानं होणार नाहीं एवढं कार्य त्यामुळं होईल!'

'तुम्ही कविता करायला लागा म्हणजे....'

'मी नाहीं तरी तुम्ही करीत असतांना, झालं तर. मला त्याविषयीं केवढी आत्मीयता वाटते!'

'उगीच मोठेपणा देऊ नका मला!'

'उगीच कसा! तो योग्य आहे. घरच्या विचारांनीं अथवा अकारण निराशेनं मन भारावून आलं कीं वाटतं खुशाल नीलाताईकडं जावं न् त्यांच्या कविता ऐकत सुंद होऊन पडावं!'

'उगीच चार चौघांत चेष्टाखोर नजरांच्या गराड्यांत उभं राहून गाण्यापेक्षां त्या निवांतपणानं बसून गाण्यांतच मला बरं वाटतं!'

'ठीक आहे. असा निवांतपणा तुम्हाला केव्हां लाभतो तें कळवा म्हणजे मी आपला दाराबाहेर बसून ऐकत जाईन!'

'दाराबाहेर कां? माझ्या निवांतपणांत तुमच्या अस्तित्वाचा अंतर्भाव आहेच ... !'

त्या रात्रीं वामनला कांहीं निराळींच स्वप्नं पडलीं होतीं!

— ज्ञानवर्धन शाळेत इंग्रजी शिकविणाऱ्या जोशी मास्तरांचा वामनवर फार लोभ होता. वामनचा इंग्रजी विषय चांगला होता. तो इतका कीं जोशी मास्तर त्याची नेहमी स्तुती करीत आणि मासिक परीक्षेला त्याचा पेपर सर्व विद्यार्थ्यांसमोर उत्साहानं वाचून दाखवीत

शेक्सपीयरवर धीरभद्राप्रमाणं त्यांचीहि वाणी अधिकारानं बोलूं शकत होती. फरक एवढाच कीं धीरभद्र प्रोफेसर म्हणून चमकत होते आणि जोशी मास्तर 'ज्ञानवर्धन' शाळेत नव्वद पंचाण्णव करीत बसले होते.

गुरुशिष्याचं हें अकृत्रिम प्रेम म्हणजे कोवळ्या आणि बन-लेल्या विचारांची गमतीची लढत होती. या लोभामुळं मधून मधून वामनला मास्तरकडून जेवणाचं निमंत्रण येई, तशा विद्वानाच्या गांठीभेटी घ्यायला मिळत.

एकदां जोशी मास्तर वामनला म्हणाले,

'काय रांजणीकर, येतां?'

'कुठं? त्या मद्राशाकडं? गेल्या वेळच्या कॉफीचा उग्रट-पणा अद्याप गेला नाहीं. अन् त्याला पाहिलं की 'जिंदातिलस्मात' च्या जाहिरातीची आठवण होते. त्यापेक्षां आपण ....'

'फार चांगल्या ठिकाणी नेणार आहे मी तुम्हाला!'

मग ते तेथल्या एका श्रीमान जमीनदाराच्या देवडीवजा वाड्यांत शिरले होते. मास्तरांचं तिथ कांहीं खाजगी काम असावं. घटकाभर आपल्याला पेशवाई थाटाच्या बैठकीवर बसून भारी तबका-तली पानसुपारी घ्यावी लागेल अशी त्याची कल्पना; पण जरा वेळानं त्यानं पाहिलं तों एक प्रशस्त हॉल होता. जिकडं तिकडं कांचेच्या 'शोकेस्'सारख्या एकावर एक रचलेल्या भारी सुबक आलमाऱ्या दिसत होत्या आणि त्या आलमाऱ्यांतून अत्याकर्षक बांधणीचीं पुस्तकच्या पुस्तकं दिसत होतीं. स्वर्गाचं दार उघडं झालं होतं कीं,

पाताळ लोकांतली पुराण दृष्टीलाहि न दिसलेलीं सौंदर्यें वर आली होतीं!

वामन थक्क होऊन उभा होता!

शाळेची लायब्ररी, मोफत वाचनालय किंवा नगर ग्रंथ भांडार या खेरीज त्याला कांहीं पहायला मिळालं नव्हतं. तेथलीं पुस्तकं म्हणजे लाल निळ्या खाणाखुणांनीं चिडबिडलेलीं, हाताळून मळविलेलीं आणि पानच्या पानं नष्ट करून टाकलेलीं. एकाद्या उधळ्या मुलानं कष्टानं मिळविलेल्या संपत्तीची धूळधाण करावी तशी सार्वजनिक हातांत त्या बहुमोल ग्रंथांची माती झालीं होती.

'ग्रंथ' म्हणायला हे होते आणि त्यांच्या सुरक्षणानं मानवजातीवर केवढा उपकार करून ठेवला होता!

संपत्ती आणिं विद्या जमीनदाराच्या कित्येक पिढ्यापासून हातात हात घालून चालत आल्या होया. श्री आणि सरस्वतीचं सांकेतिक वैर इथं खोटं ठरल्याचं उदाहरण होतं. विद्येकडं दुर्लक्ष झालं कीं संपत्तीचा ऱ्हास जवळ आला अशीच समजूत त्या घराण्यांत रूढ होती. चालू पिढी तर पूर्वीपेक्षांहि अधिक सुविद्य होती. त्यांच्या अभिजात रसिकतेचा सुगंध दूर दूर पसरल्यामुळं पांडित्य आणि कलेचं तिथं नेहमी सहास्य स्वागत होत होतं. मास्तरकडून वामनला ह्या गोष्टी कळल्या आणि वेगवेगळ्या विषयांवरील मराठी आणि इंग्रजी पुस्तकांचे वर्गवारीनं जुळविलेले ते बहुमोल गट पाहून वामन म्हणाला,

'मास्तर! संपत्तीचा इतका चांगला विनियोग आणि उपयोग अन्यत्र आढळणार नाहीं!'

'होय ना? आपली थोडीशीच मिळकत; पण आपल्याला तिला कपडेलत्ते, खाणंपिणं आणि मुलांचे आजार या खेरीज चांगला उपयोग करतां येत नाहीं म्हणून क्षुद्रत्वाची जाणीव होऊन जीभ हासडून प्राण द्यावासा वाटतो!'

'मी अगदी वेडा होऊन गेलों आहे. असं वाटतं कीं, त्रिलोकेश्वराच्या पुजेसाठीं कुबेरानं जमा केलेली हीं अपूर्व नीलोत्पलं—'

'ही नीलतेची कल्पना तुमच्या बोलण्यातून नेहमी येत असते. ह्या कल्पनेनं असं काय भारून टाकलंय् तुम्हाला?'

वामनला नीलेची एकदम आठवण झाली. आपलं प्रणयाचं रहस्य मास्तर पुढं प्रगट करावं कीं काय असं त्याला क्षणभर वाटलं. मग तो म्हणाला,

'नीलतेची कल्पना माझ्या मनांत केव्हां आणि कशी रुजली हें नीटसं मला सांगतां येणार नाहीं. उदात्त कल्पना आणि श्रेष्ठ साध्यें काय आणि कशीं असतात, असं कुणी विचारलं तर नीलोत्पल, निळं माणिक किंवा आकाशाची अथांग नीलता ह्या गोष्टी प्रतीकं म्हणून मी त्याला सांगेन!'

बोलण्याच्या आवेशांत त्याच्या विशाल नेत्रांच्या आकुंचन आणि उन्मेषाकडं मास्तर क्षणभर कुतुहलानं पहात होते. वामन पुढं म्हणाला,

'असं वाटतं कीं आयुष्याचा गुजारा करीत असतां असा भला मोठा ग्रंथ-संग्रह जमवावा, किंबहुना तो जमविण्यासाठींच आयुष्य घालवावं आणि एकदां ती इच्छा पूर्ण झाली कीं उशाला, अंगाशी, खालीं आणि उरावर एकेक ग्रंथ घेऊन त्यांच्याशीं तन्मय व्हावं. त्यांतील रसवंतीचा आकंठ आस्वाद घ्यावा, त्यांतील विचार कणाकणांत मुरवून घ्यावे, स्वतःला त्यांत खोलवर पुरवून घ्यावे!'

'रांजणीकर! तुमच्यासारखे कांहीं विद्यार्थी पाहिले कीं वाटतं आपल्याजवळ आहे नाहीं तेवढं त्यांना अर्पण करावं. प्रत्येक विद्यार्थी माझ्या बुद्धीच्या उंचीला येऊन पोंचला कीं एकादं अद्या-वत ग्रंथ-भांडार त्याला अर्पण करून मरावं आणि मरतां मरतां त्याला सांगावं कीं ज्ञानदानाचं हें कार्य कालाच्या अंतापर्यंत चालेल असं कर. तें करण्यासाठींच जीवंत रहा ...!'

मास्तरांनीं हवं असलेलं पुस्तक तेथून मिळविलं.

बाहेर पडल्यावर गुरुशिष्य आपापल्या विचारांत भारल्या-सारखे चालले होते.

रात्रीं गोकुळदास बिल्डिंगच्या खोल्या खोल्यांतून अभ्यासा-खेरीज वेगवेगळे उपक्रम चालत होते. फ्रेंच युवतींचे अल्बम उल-गडले जात होते. प्रणयरसाचीं निनांवीं पत्रं लिहिलीं जात होतीं आणि एकाद्या रसाळ ग्रंथमालेचा किरकोळ मिळविणारा ग्रंथ वाचला जात होता. त्यांतील ठराविक आकर्षणाचीं वर्णनं इतरांनाहि वाचून दाखविलीं जात होती.

वामन कांहीं निराळ्याच विचारांच्या झपाट्यांत सांपडला

होता. कुठं गुप्त बैठकी होत होत्या. उत्तेजित करणारीं भाषणं चालत होतीं. शपथविधी उरकले जात होते. वामननं मग एक स्वप्न पाहिलं होतं.

तो एका प्रशस्त हॉलमध्यें बसला होता. पलीकडं त्याहीपेक्षां मोठा दिवाणखाना होता अन् जोशी मास्तर एखाद्या भल्या मोठ्या समुदायापुढं भाषण करावं तशा उंच आणि कळकळीच्या आवाजांत कुणाशीं तरी बोलत होते. वामनच्या सभोंवती ग्रंथाचा ढिगारा पडला होता. ग्रंथाच्या शेजारीच नीला हंसत उभी होती. इतक्यांत दारावर कुणाची तरी थाप पडली. फांशीचा हुकूम घेऊन पोलीस आले होते. नीला घाबरली होती कीं काय न कळे!

वामन म्हणाला होता,

'नीला असं खिन्न होऊन कसं चालेल. मी तर समाधानाच्या टोकावर उभा आहे. मनासारखी विद्या संपादन केली. तुजवर प्रेम केलं. आतां देशासाठीं मरायचं आहे. पलीकडं जोशी मास्तर बसले आहेत त्यांना सांग, वामन फासावर चढण्यासाठीं निघाला आहे. तुझ्या सदिच्छा आणि त्यांचे शुभाशिर्वाद असल्यावर आणि ह्या ग्रंथभांडारांतून यथेच्छ विहार केल्यावर मरणाचं भय तरी कसलं? " माझ्या मृत्यूनं स्वातंत्र्यलक्ष्मीचा उदयकाल खात्रीनं जवळ येणार बघ!"

दुसऱ्या दिवशीं मोडींत लिहिलेलं एक पत्र आलं होतं.

"चिरंजिवास अनेकोत्तम आशिर्वाद" अशी सुरवात करून

पुढं लिहिलं होतं, "आपला अभ्यास नीट चालला असेल असें वाटतें. अलीकडे गुडघी रोगानं मीं हैराण झालों आहे. हंगामाचे दिवस असल्यामुळें गिरणीतच रहावे लागते. घरीं जाण्यायेण्याचा शीण सहन होत नाहीं. आपण काळजी करूं नये. अभ्यासाकडे मात्र नीट लक्ष पुरवावे ..."

आणि वामनचं काशीवर जायचं स्वप्न तसंच राहिलं होतं. जणू त्यासाठी योग्य काळ यावयाचा होता आणि त्याची वाट पहाणं त्याला भाग होतं !

---राजनगरांत सेवासंघाचं प्रस्थ दिवसेंदिवस वाढत होतं. 'सेवा' या शब्दाच्या व्यापाला संघानं काय मर्यादा घातल्या अस-तील त्या असोत. सार्वजनिक अथवा वैय्यक्तिक वाटेल ती सेवा करायची असं स्थूल मानानं संघाचं ध्येय होतं. एकाद्या संस्थेचा अथवा व्यक्तीचं निमंत्रण आलं कीं खादीचा गणवेष घातलेलं संघाचं लहानसं पथक शिस्तीत निघत होतं. अन् तें रस्त्यावर आढ-ळलं कीं, प्रामुख्यानं दोन तीन गोष्टीच पहाणाऱ्याच्या मनांत येत होत्या. कुठं तरी एकादी सार्वजनिक सभा असावी; एकादा पुढारी किंवा चारचौघांत गणला जाणारा एकादा माणूस आजारी असावा, नाहीं तर एकादी प्रेतयात्रा निघणार असावी. बहुधा दुसऱ्या-तिसऱ्याच गोष्टी पथक पाहून पुढं येत होत्या. एकादा जिज्ञासू सुतकी चेहरा करून आणि हाताचा पंजा हालवून विचारीत होता,

'काय हो, कोण .... ?'

'कोण'च्या पुढं शब्द निघाले नसले तरी कुणी तरी खलास

झालं ना, असाच प्रश्न गर्भित होता.

रूम नंबर मदतीसनं एकदा एका लहानशा सभेत सांगितलं, 'संघाकडे पहाण्याचा जनतेचा दृष्टिकोण दुषित झाला आहे. संघाचे सदस्य म्हणजे प्रेतं वाहणारे हमाल, असं समजलं जात आहे. आमचं पथक रस्त्यावर दिसलं कीं स्मशानयात्रे खेरीज, पहाणारा निराळी कल्पना करीत नाहीं. ह्यात संघाचा दोष नाहीं. प्रेत आणि स्मशान ह्या विषयींच्या कल्पनांत फरक आहे. जन्मोत्सव जेवढ्या आनंदानं साजरे होतात तशाच आनंदात प्रेतयात्रा काढल्या जाव्या. जन्म तेवढा चांगला आणि कैलासवास वाईट हें कसं? साधतील तेवढे पुरुषार्थ साधीत माणूस गतप्राण झाला ह्यात कांहींच मोठेपणा नाहीं? मला तर वाटतं कीं मृत्यू हीच एक अशी गोष्ट आहे कीं, जगणारांनीं ज्याचा सहास्य सत्कार करावा स्मशानावर ग्रे सारखा कवि वागीश्वरीचे बहुमोल अलंकार ठरतील अशा विलापिकांच्या पंक्ती लिहितो. आणि आपण स्मशान वैराग्यानं भारावून जातों.

स्मशानातलं दृश्य असं दिसतं कीं, मृताचे संबंधीं दुमुर्खलेले दूर बसतात. तिऱ्हाईतांचा जो अड्डा जमतो, तो मात्र वेगळीकडं बसून खुशाल कुटाळ गोष्टी चर्चित असतो........यात्रा या शब्दातला खरा अर्थ घेतला तर सुतकीपणा आणि दुश्चिन्हाच्या कल्पना नाहींशा होतील. प्रेत वाजत गाजत न्यावयाची आंध्रांची पद्धत त्या दृष्टीन चांगली वाटते........"

पांढरा पटका बांधलेला एक कर्मठ म्हातारे बुवा म्हणाले,

"आपल्या बापाची काढ म्हणावं हवी तशी यात्रा. सुधारणा

करतोय म्हणे सिंचा—"

वामननं अत्यंत सभ्यतेनं उत्तर केलं होतं,

"आमच्या वडिलांना अद्याप अवधी आहे दादासाहेब. तुमच्या गोवऱ्या मात्र स्मशानांत पोंचल्या आहेत. नमुनेदार प्रेतयात्रेला तुमच्या पासूनच प्रारंभ करूं आम्ही !........"

गोकुळदास बिल्डिंगवर नेहमी बोलला जाणारा आणखी एक विषय म्हणजे तेथली हॉटेलं ! त्यावेळीं राजनगरांत दोनतीन भोजनालयं वेगवेगळ्या कारणासाठीं प्रसिद्ध होतीं. कपालकुंडल नरसिंगरावांचं 'उडपी हॉटेल' सर्वांत जुनं. प्रथम प्रथम रोजचीं शेसव्वासे पात्रं तिथं उठत होतीं. पण त्यांच्या तेलिया वर्णाला आणि तपकिरीच्या प्रपाताला लोक कंटाळले. तशांत तांबवेकरांचा 'सुग्रास निवास' निघाला. आणि मग नरसिंगराव अक्षरशः माशा मारित ग्राहकांची वाट पहात बसूं लागले. हायकोर्टांत मुकदमा लढवायला आलेला एखादा पाटील नाहींतर पटवारी त्यांच्या तावडीत सापडला तर सांपडायचा. आणि एकवेळ जेवला कीं तीन दीवस ओकत बसायचा.

तांबवेकरांच्या निवासांत सोवळंओवळं सारं कांहीं होतं. पण भाव असे चढेल कीं सामान्य माणसाला ते परवडणारे नव्हते. मेडिकल कॉलेजातले कांहीं गर्भश्रीमंत विद्यार्थी आणि राजनगरला येणारे सुटाळ एजन्ट अशी माणसं तिथं बांधलेलीं होतीं.

तशांतच मावशीची खाणावळ निघाली आणि स्वस्त दाक्षिणी जेवणाची चांगली सोय झाली !

मावशीचं एकुलतं एक पुत्ररत्न हॉटेलातून चोरी करून

पळालं. त्या आघातनंच कीं काय मावशी आजारी पडल्या. दवा पाणी आणि जाग्रणाची कामगिरी सेवा संघानं पत्करली. संघाच्या सेवेला यश द्यावयाला ईश्वर समर्थ नसावा. एके दिवशीं सकाळीं तीन वाजतां मावशी आटोपल्या!

अखेरच्या घटकेला मुलगा जवळ नव्हता. नसला तरी काय उणीव होती? एकाद्या देशभक्ताची निघाली नसेल एवढ्या प्रचंड समुदायासह मावशीची प्रेतयात्रा निघालीं होती. ज्ञानवर्धन शाळा अर्ध्या दिवसासाठीं बंद पाडण्यांत आली होती. आईपेक्षांहि मोठी समजली जाणारी मावशी कित्येक राजनगरी विद्यार्थ्यांना पोरकं करून चालती झाली होती. ती होती म्हणून विद्यार्जन सुलभ झालं होतं. तिच्या हातचा स्वयंपाक खाल्लेल्या कित्येक विद्यार्थ्यांना खरंच फार हळहळ लागून राहिली होती! ईश्वरानं तिच्या आत्म्याला शांती द्यावी, असं तिच्या कित्येक धर्मपुत्रांनीं चिंतन करून अखेर तिला अग्नीच्या स्वाधीन केलं होतं!

संघाच्या नव्या आमदानींत एक नवी आणि हितकारक गोष्ट घडून आली. संघानं विधर्मियांच्याहि प्रेतयात्रेला हजर राहण्याचा प्रघात पाडला आणि तो सुरू होतांच धार्मिक मिरवणूकींतही संघ भाग घेऊं लागला. हिंदू मुसलमानांचे दंगे म्हणजे कोणत्याहि गांवच्या इतिहासांत नेहमी ठळकपणानं उल्लेखिली जाणारी गोष्ट होऊन बसली होतीं. राजनगरांत मधून मधून अशा गोष्टी घडत होत्याच. मुसलमानांनीं दिंड्या उधळून लावाव्या आणि हिंदूंनीं मग नीट जुळवाजुळव करून भरपूर उट्टं काढून घ्यावं, असे प्रकार नेहमी होत.

पण मग असं दृश्य दिसूं लागलं कीं एकादी मिरवणूक निघाली कीं तो हिंदूंची कीं मुसलमानांची हे पाहणाराला लवकर ओळखूं येत नसे. कारण प्रत्येक मिरवणूकींतून हिंदूमुसलमानांची दाटी झालेली असे. दर्गा किंवा देऊळ अशा बाह्य साधनावरून किंवा त्या त्या विशिष्ट दिवसाच्या सणावरूनच मिरवणूकीची जात ठरवावी लागे. त्या वर्षी राजनगरच्या कोणत्याहि भागांत दंगा अथवा मामुली स्वरूपाचं भांडण झालेलं कुणी ऐकलं नाहीं किंवा वर्तमान-पत्रांत आलेलं आढळलं नाहीं!

सेवा संघाची अशीं विविध कार्यें चालूं असतां वामनाच्या मनांत विचार येत होते, जनतेच्या हितासाठीं संघ झटतो आहे असं आपण गर्जून सांगत आलों. हिंदूमुसलमानांची जातीय तेढ कमी केली. ह्यागोष्टी अशाच चालूं राहतील हें कशावरून, कारण मधून मधून कांहीं तरी खुसपट निघनं आणि ते मिटवितां मिटवितां पुरेसे होतं. यासाठीं धर्म भिन्नतेची जाणीव नाहींशी केली तर...? आणि दुसरं असं कीं संघ लोकांची सेवा करीत नाहीं तर उलट त्यांना ऐदी, आराम खोर करीत आहे. एकाद्या माणसाच्या घरीं जाग्रण करायचं झालं तर सेवासंघाचे विद्यार्थी आजाऱ्या भोंवती पाळी पाळीनं जागत बसत होते. आणि आजाऱ्याचे नातलग, आहेत. हे जागायला म्हणून गार झोप घेत होते. अडचणीच्या वेळीं एकाद्याला मदत करणं हें प्रत्येक नागरिकांचं कर्तव्य होय. पण अड-चण आली कीं कष्टांचा उपसा करायला सेवासंघ तयार असतोच, ही वृत्ती बळावत होती आणि श्रम व स्वावलंबन ह्या पासून माणसं

स्वतःला वाचवूं पहात होतीं ....!

"आमच्या घराची मोरी तुंबली आहे. अर्जावर अर्ज देऊनहि शहर सफाई खातं जागं होत नाहीं, तुमचा संघ कांहीं मदत करील कां?" अशा अर्थाचे वात्रट प्रश्न केले जात होते. दोन थोबाडीत मारून अशा प्रश्नांना समर्पक उत्तर देणं कठींण नव्हतं; पण संघाच्या कार्याचं वैय्यर्थ्य दाखवायला तो प्रश्न पुरेसा होता ....

संघ सोडतां मोहनांच आणखी एक घटना घडली.

माधवराव तळशीकर आजारी पडले.

कुठल्याशा एका धरणाच्या सर्व्हेसाठीं त्यांची रवानगी झाली होती. श्रम आणि हवापाणी त्यांना मानवले नसावे. ते परत आले तें ज्वरांत वाटेल तसं बडबडत हाताखालच्या नोकरांनीं त्यांना घरीं आणून टाकलं. कांहीं तोलाच्या मित्रांनी एक दोन उत्तम डॉक्टर आणून औषधोपचाराची व्यवस्था केली, पाठीमागं व्यवसाय असलेली मित्रमंडळी वेळ सांपडेल तेव्हां समाचार घेऊन जाऊं लागली. आणि औषधाबाबत सूचना उपसूचना करूं लागली. शुश्रुषेचें बाकीचे कष्ट करायला कोण तयार होतं! नीला घाबरली होती. वामन माधवरावांच्या आंथरुणाशेजारी रात्रंदिवस बसून होता. डॉक्टरनं नेमलेलं औषध नियमानं देत होता. मोसंब्यांचा रस पाजीत होता. बर्फाच्या पिशव्या कपाळावर ठेवीत काढीत होता. पांघरुण बदलीत होता. समाचाराला आलेल्या मंडळींना सुपारीची बशी पुढं करीत होता. रात्रभर जागत बसत होता आणि नीलेला धीर देत होता. मार्च महिना सुरूं होऊन संपू लागला होता. माधवरावांच्या प्रकृतींत

त्राईट बदल होत चालले होते. अविनाश मूंद आणि वेमावत्र वडि-लांकडं पाहून खिन्न होत होता. नीला म्हणत होती,

" वामन, कसं होणार आमचं आतां? आईवाचून उघडी पडलेलीं आम्ही मुलं. वडिलांची अशी अवस्था पाहून जिवाला पिळ बसतो आहे रे........!'

" नीला तुझ्या सारख्या समंजस मुलीनं धीर सोडून कसं चालेल ? ऊठ पूस पाहूं डोळे. अविनाश झोपला ना ? आपली प्रार्थना ईश्वराला ऐकूं जात आहे. याची खात्री ठेव.... !

असं म्हणून वामननं तिला धीर दिला होता. रात्र होत होती. माधवरावाचं कण्हणं स्पष्ट ऐकुं येत होतं. अविनाशला पुढं घेऊन नीला झोपलेली दिसत होती. तिच्या आणि माधवरावांच्या चेहऱ्याकडं पहात वामन मनोमन प्रार्थना करीत होता,

" विश्वातील सुकृतींना कारक ठरणाऱ्या शक्तींनो ! चला माझ्या साहाय्यासाठीं धावून या.......!"

अखेर एक दिवस असा आला कीं माधवराव अखेरच्या टोकावर जाऊन पुन्हां परत वळले !

त्या संस्थानांत वार्षिक परीक्षा संपून गेल्या होत्या आणि मग एके दिवशीं वामन गोकुळातून गडप झाला होता !.......हो. गडप झाला नाहीं तर काय !

जून महिना सुरू झाला. वर्तमान पत्रांच्या पुरवण्या निघाल्या. परीक्षांचे निकाल झळकले. यंदाचा उन्हाळा जास्तच होता तेव्हा पाऊसही जोरात पडणार अशी भाकितं होऊन गेली. शाळा

कॉलेजाकडची रहदारी वाढूं लागली. जुलै पाठोपाठ ऑगस्ट हि खलास झाला. तरी रूम नंबर सदतीसचा पत्ता नव्हता!

तो परीक्षेला बसला नव्हता. शिक्षण मोडण्याची त्याला लहर आली होती कीं काय?

आणि हें काय? रूम नंबर सदतीस मध्ये हा कोण नवा राजपुत्र आला होता? तो कुठल्याशा इंटर कॉलेजांतून आतां बी. ए. साठीं इथं आला होता. पोशाख आणि सामान सुमानावरून स्वारी श्रीमंत घराण्यातली असावी असं वाटत होतं. आणि तें खरं होतं. इंदेवाडीचं 'ताळबंदे' (ताळबांधे) नांवाचं जें घराणं संपत्ती आणि सरकारी मान सरानबानं पुढं आलं होतं, त्या घराण्यातला हा मुलगा. वडील भाऊ आबकारी खात्यांत मोठ्या अधिकाऱ्याच्या जागेवर होता. मधल्यानं इंजिनियरिंगची विलायती पदवी घेऊन नुकताच कुठल्याशा जिल्ह्यावर प्राथमिक अधिकार मिळविला होता. आणि हा धाकटा भाऊ कोणती गॅझेटेड् जागा मिळविणार हें मिरवायला अद्याप अवधी होता. रंग सांवळा आणि यष्टी यथातथाच. पण स्वास्थ्य आणि श्रीमंतीचा माज रंगाच्या तकतकींतून, बोलण्यातून, आणि वागण्यातून तळपून जात होता. तो सिगारेटचा भक्त नसला तरी तंबाखू खाणारा होता. भारी सूट घातला तरी खिशांत चंची ही असायचीच! आणि तो गोकुळाच्या पायऱ्या चढूं उतरूं लागला कीं खोल्या खोल्यातून पुकार होत होती,

'चंऽचींऽऽ........'

रूम नंबर सदतीस त्याला मिळूं नये असा काहींनीं प्रथम

प्रयत्न केला. पण एक तर वामनचा अद्याप ठिकाणा नव्हता. खोलीचं भाडं वसुल करण्यासाठीं येणारा अंबरसिंग तरी किती दिवस वाट पाहणार? आणि शिवाय ताळबं : इतरत्र खोली मिळत नाहीं म्हणून वाटेल तें भाडं द्यायच्या तयारीनं आला होता!

सप्टेंबर महिन्यांतल्या एका सकाळीं राजनगरावरचं आभाळ भरून आलं होतं. फुटके पातळ ढग झिमझिमत होते. साऱ्या शहरावर अवकळा पसरल्यासारखी झाली होती. वाहनांचे सूचनात्मक आवाज होत होते तेहि अस्पष्ट आणि रडके!

'हडलूहक' करीत पावसांत भिजत आलेला एक टांगा गोकुळापुढं उभा राहिला होता आणि तत्काळ गोकुळांत बातमी पसरली होती,

'आला रूम नंबर सदतीस!'

कांहीं विद्यार्थ्यांनीं रांगेनं उभं राहून शाही सलामी दिली आणि स्वागतपर चित्कार काढून सारं गोकुळ दणाणून सोडलं;

सदतीस नंबरची खोली परक्याची झाली आहे हें कळल्यावर वामनला वाईट वाटल्याशिवाय राहिलं नाहीं. एक म्हणाला, 'तूं नुसता आम्हाला इषारा कर. आम्ही त्याचं सामान भिरकाऊन देतों!'

वामननं तो अत्याचार होऊं दिला नाहीं. इंग्रजी चांगलं म्हणून रांजणीकरांचं नांव ताळबंदेच्या कानीं आलं होतं. परिचय होतांच वामनला त्यानं आपल्या खोलीत जागा दिली आणि म्हटलं, "बरं झालं तुमची ओळख झाली. तुमचं इंग्रजी चांगलं म्हणून मी ऐकलं आहे. मला तुमची फार मदत होईल!" या वर्षाचा अभ्यास-

क्रम येथून तिथून पोचट होता. मॅट्रिकला नाटक ठेवायची पद्धत उडविली जाऊन 'Shakespeare's Stories' नांवाचं कॉन्टन्स आणि मेरी मॉडचं कथात्मक पुस्तक होतं आणि ताळबंदेच्या पुस्तकांत 'व्हेनिसचा वाणी' ( Merchant of Venice ) लाल आवरणावरील सोनेरी अक्षरांत झळकत होता. चार्लस् लँबचं पुस्तक पाहून गडकऱ्यांच्या नाटकांना कथास्वरूप द्यावं असं वामनच्या मनांत आलं होतं. त्या भरांत एकच प्याला, पुण्यप्रभाव इत्यादि कथा त्यानं लिहून ठेवल्या होत्या. ताळबंदेला हें त्यानं सहज बोलतां बोलतां सांगितलं. ताळबंदेला त्यांत कांहीं गोडी वाटेल असं दिसलं नाहीं. आपल्याला न समजणारी एखादी गोष्ट इतरांनीं केल्यावर उपचारात्मक कांहीं तरी प्रशंसोद्गार काढावे, तसं कांहींसं ताळबंदे बोलला होता. अशा स्वरूपाच्या प्रशंसेत धड रसिकताहि नसते किंवा उपहासहि नसतो. आपण तें ऐकून गप्प बसावं आणि मनांत म्हणावं, 'कळलं महाशय ह्या विषयांतलं आपलं गम्य!'

यंदाच वर्ष गतवर्षासारखं नव्हतं आणि त्यापूर्वीच्या वर्षासारखं तर मुळीच नव्हतं. उत्पात होत गेले आणि उत्साहावर घाला पडला म्हणजे आयुष्य पुढं ढकलण्याऐवजीं जीवनाचा क्रम उलटा व्हावा असं वाटूं लागतं. वामनचं मॅट्रिकचं सध्याचं तिसरं वर्ष होतं. त्याचा इंग्रजी विषय चांगला तयार होता. इतिहास आणि मराठी या ऐच्छिक विषयांत तो कच खाईल हे शक्य नव्हतं. प्रश्न होता गणिताचा. पण कांहीं ठराविक ठशाचीं तीस पस्तीस मार्कांचीं गणितं तयार ठेवलीं की काम खलास, असा त्याला विश्वास होता; पण

पहिल्या वर्षी गणिताचा पेपर सोडवून तो बाहेर पडल्यावर ' आपण गळणार ' असं त्यानं जोशी मास्तरांना न् मित्रांना सांगितलं होतं. ते खोटं ठरलं नव्हतं. दुसरं वर्ष समाज-सेवा करण्यांत चालू लागलं होतं. दिवाळीची सुटी झाली कीं गणिताच्या पिच्छावर पडायचं असं त्यानं ठरविलं होतं; पण वार्षिक परीक्षा जवळ येत चालली तरी वामननं गणिताकडं पाहिलं नव्हतं आणि परीक्षेच्या दिवसाच्या ऐन धामधुमीत माधवराव आजारी पडले होते. तशात एके दिवशीं ' चि. वामनराव यांस आशिर्वाद ' असं मोडींत लिहिलेलं पत्र आलं होतं. तें पत्र नेहमीच्या हातचं नव्हतं. वडील आजारी असल्याची त्यांत बातमी होती. लगेच तार आली होती आणि त्याला निघून जाणं भाग होतं. घरून येणाऱ्या तारांना सहसा कधीं चांगला अर्थ नसतो वामन घरीं पोंचतांच अडीच तीन तासांनीं त्याचे वडील वारले. वारले ते संसार शक्य तितका अनिश्चित ठेऊन! ....

दुःखोपभोग, कर्जाची निरवानिरव आणि कुटुंबीयांची तात्पुरती व्यवस्था झाल्यावर परत राजनगरला यावयाला वामनजवळ पुरेसे पैसेदेखील नव्हते.

त्याचे वडील एका कापसाच्या गिरणींत वहीखातं लिहायला होते. हंगामाच्या दिवसांत कापसाच्या गाड्या येत होत्या. त्यांचं वजन नोंदलेल्या यंतील तशा चिठ्ठ्यांची चुकवती करण्यांत रात्रीचे दहा वाजत होते. मोंढ्यांत गाड्यांची गर्दी दिसत असे. ' काळीपत्ती ' ' लालपत्ती ' अशी निवड होऊन भाव काढला जाई आणि मग खरेदी विक्रीचे तोडचे आणि गंज्या उभारण्याचें काम सुरू होई.

वेस, मारुती, आणि विठोबाचं मंदिर हीच ज्या गांवांतली एकमेव प्रेक्षणीय स्थळं, अशा ठिकाणीं राजनगरच्या गोकुळांत विद्यार्थी दशा घालविलेल्या, हॅम्लेट, रोमिओ किंवा एकाद्या मिरॅन्डाच्या स्वभावाची मार्मिक चिकित्सा करणाऱ्या माणसाला राहतां येणं शक्य नव्हतं. पुढच्या शिक्षणाचीं स्वप्नं बाजूला ठेवून नोकरी करणं अवश्यक होतं. परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय नोकरीच्या जगांत पाय रुजणार नव्हता. कुठुनतरी नियमानं थोडेबहुत पैसे येतील असा आधार राहिला नव्हता. तो राजनगरला आला तेव्हां त्याच्या बहुतेक शिकवण्या त्याला यावयाला वेळ झाला म्हणून दुसऱ्यांनीं पटकविल्या होत्या. जोशी मास्तराकडं थोडी उसनवारी करावी म्हटली तर त्यांनीं खाजगी शाळेतली अनिश्चितपणाची नोकरी सोडून राजनगरचाहि त्याग केला होता. सुग्रास निवासाची एक महिन्याची बाकी द्यावयाची राहिली होती. आणि वामनचं पाकीट तर रिकामं होतं!

दुपारीं खालच्या चौकातल्या नळावर मळके कपडे खूप साबण लावून त्यानं धुवून टाकले. नळाची धार सारखी अंगावर घेत मनसोक्त स्नान केलें. नवनव्या सुखद आणि उत्तेजक विचारांना कारक होणाऱ्या जगांत तो पुन्हां प्रवेशला होता! आणि राजवाड्यांत प्रवेश करायचा झाला म्हणजे सुमंगल स्नानानं शुचिर्भूत व्हावयाला नको होतं? वाळलेलं नेहरूशर्ट घालून तें आपल्याला छातीला कितपत चिकटून खुलतं आहे हें त्यानं आरशांत पाहिलं. स्वतःच्या चेहऱ्याऐवजी त्यांत त्याला निराळाच चेहरा दिसला अन् लगेच कुठून तरी शब्द आले,

'आलास! किती वाट पहायची तुझी!.......'

निळ्या घरांत त्यानं पाऊल टाकलं तेव्हा अविनाश अंगणांत जमा झालेल्या पाण्याचे काठीच्या सहाय्यानं वेगवेगळे पाट काढीत होता. ईंजिनियरच्या मुलानं आणखी काय करायला पाहिजे होतं? वामनला पहातांच त्यानं घरांत धांव ठोकली. नीलेला धुसळून तो म्हणाला,

'ताई! ले-आ-र-स्त-मा!'

'मी कांहीं ब्रह्मदेवाची नात नाहीं, तुझ्या उखाण्यांतला प्रत्येक वेळीं अर्थ उलगडून काढायला! सरळ सांग काय सांगायचं तें!'

'अगं, उलट्या शब्दांना सुलट करायचं! इतकी साधीं गोष्ट तुला समजत नाहीं?'

असं म्हणून त्यानं तिचं तोंड दाराकडे वळविलं होतं. अविनाशच्या हातांतले आपले चेपलेले गाल तिनं सोडवून घेतले होते. आणि नीलोत्पलाच्या निमिषोन्मेषांनीं आणि स्मिताचे रंगराग उधळीत दारांत दिसलेल्या वामनचं स्वागत केलं होतं.

वामननं डोळ्यांनीं तिची प्रत्येक हालचाल टिपून घेतली होती. अतीव नाजूक शब्द ब्रह्माला ज्या प्रतीत करतां येणार नाहींत किंवा चित्रकाराच्या कुंचल्यालाहि ज्या आत्मसात करतां येणार नाहींत अशा त्या सुश्लिष्ट तरल मधुर रेषा जणूं कधीं इकडे कधी तिकडे अशा फिरत होत्या, कीं फिरण्याचा आभास उत्पन्न करित होत्या? चुंबनानं किंवा चिंतनानंच त्यांचं अस्तित्व कळूं शकत होतं अन् त्यांच्या गतीचा वेध घेतां येत होता!

गर्द जांभळ्या रंगाची एक गर्भरेशमी तलम साडी ती नेसली होती. त्यांतून झळाळणारं वर्णाचं 'सुवर्ण', डोळ्यांतलं गहिरेपण आणि चक्राकार वेणीतल्या गजऱ्याची चमकी, त्यांत विद्युत्कला होती कीं रतीच्या सौहार्दाच्या त्या द्युतिच्छटा होत्या? आणि तिनं पदर सांवरला तेव्हा गळ्यांतली दोलायमान झालेली मोत्याची माळ....... प्रियतमाच्या कुशीत नाहींतर मननांत असतांना डोळे मिटल्यावरहि जो प्रकाश दिसतो त्याच प्रकाशाचं पाणी त्या मोत्यावर होतं कीं काय?

गेले तीन चार महिने नुसते उत्पाताचे होते. दुःख आणि दैन्याखेरीज सभोवतीं त्याला कांहींच दिसत नव्हतं. आणि इथं या राजनगरांतल्या निळ्या घरांत, गर्दजांभळ्या वेषांत, आणि लाल चुटुक ओठांच्या स्मितगर्भ पाकळ्यांत केवढा रम्य आशय वामनची वाट पहात होता! वामन नुसता हरखून गेला!

अभ्यासाचा गाडा आतां व्यवस्थित सुरूं झाला होता. समाजकर्मं गुंडाळून ठेवलीं होतीं. पैशाची अडचण व्यक्त करतांच नीलेनं आपल्या खाजगी जमविलेल्या ठेवीतली शंभराची एक कोरी करकरीत नोट वामनला दिली होती. नुसता गणित विषय तयार करून परिक्षेला बसायचं असल्यामुळं वेळ पुष्कळ होता, म्हणून एम्पायर ट्रेडिंग कंपनीत त्यानं नोकरी धरली होती. नीलेच्या उसनवारीतून दोनतीन महिन्याची घरची आणि थोडीबहुत स्वतःची तरतूद झाली असली तरी त्या रकमेची फेड करणं अवश्यक होतं.

त्या दिवशी पगार हातीं आला होता. सकाळचं जेवण घेण्या-

साठीं हॉटेल कडं जात असताना त्याचीं पाऊलं निळ्या घराकडं वळलीं.

नीला पाकसिद्धीनंतरची आवरा आवर करीत होती. माधवराव आणि अविनाश नुकतेच बाहेर पडले असावे असं दिसत होतं.

वामननं विचारलं'

"हे काय? स्वयंपाकीणबाई नाहीं?"

"कावळा शिवला आहे त्यांना!"

"स्वयंपाक तर मोठा नामी झाला असेल तुझा मग."

"हो तर! काय सांगायला पाहिजे?"

"कांहीं सांगूं नकोस. दिसतच आहे तें. केसावर न् गालावर पीठ उधळून घेतलं आहेस. आरशांत पहा जरा. स्वयंपाक करतांना करावं लागणारं हें प्रसाधन आहे?"

"तुला काय चेष्टा करायला! तीन तास चुलीजवळ बसून तापले आहे मी!"

"अरेरे! नागपूर मॅट्रिकला बसणारी मुलगी...."

हं तोंड आटप न् ये जेवायला. बसूं या आपण. माझं जेवण व्हायचंय अद्याप!"

"मग नको! कारण जें आहे तें वेतावेताचं दिसतं आहे. अन् मला तर भूक सपाटून लागली आहे. तूं जेव म्हणालीस. पावलं त्यांत सारं कांहीं!"

"बैस तर खरा. कित्येक दुर्गास जेऊन उठतील एवढ्यांत"

ताट पाटाची तयारी झाल्यावर वामन बसला होता, जेवतांना तिनं विचारलं,

"कसा झाला आहे स्वयंपाक?"

"आज काय सांगू तुला? 'सुग्रासाच्या आठवणी' नांवाचं एक पुस्तक पंचविशी संपतांच लिहावयाचा विचार आहे माझा. त्यांत तुला वाचायला मिळेल तुझ्या स्वयंपाकावरचा माझा अभिप्राय!"

"ह्या आमटीवरहि एक स्वतंत्र प्रकरण घाल त्यांत! म्हणजे एकाद्या वर्गाच्या अभ्यास-क्रमांत तें स्थूल वाचनासाठीं नेमलं तर मास्तरांना न् विद्यार्थ्यांना ---"

"आमटी मात्र आळणी झाली आहे! तुम्ही सारींच माणसं मोठीं आळणी दिसतां— ?

"ती कशी!"

"एकाहि पदार्थांत तिखट असं मुळीच नाहीं!"

"ठेचा हवाय कीं काय तुला?"

"नको! ठेच्यावर आमच्या अक्रुर कवीची एक कविता आहे. तांबेकरांनीं एकदा त्यांना ठेचा वाढला तोंडाला झोंबल्याबरोबर तत्काल स्वारीनं कविता ठोकून दिली! तो ठेचा एकाद्या तरुणीनं खाल्ला तर तिचे ओठ निळे काळे पडतील अस कवितेच्या शेवटीं त्यानं सार काढलं आहे. अन् खरंच एरव्ही बायकांनीं तोंड पोळवून घेणं चांगलं कां?"

त्यावर आपली दटावणारी दृष्टी तिनं त्याच्यावर रोखली होती.

कपडे करतां करतां वामननं आपल्या खिशांतली एक दहाची नोट तिच्यापुढं करीत म्हटलं हे.तं,

" हे माझे दहा रुपये जमा करून घे! —"

" कसले?"

" तुझा ऋणको आहे ना मी! "

"असं असं! हप्त्या हप्त्यानं देणार आहेस म्हणायचा! पण देण्या घेण्यांत हस्तेअंदी झाली कीं— हं हसूं लागला आहेस. कांहीं वात्रटासारखं बोलणार असशील. ठेव तुझ्याजवळ तुझे पैसे"

वामन तेथून बाहेर पडला तेव्हां मोठी चमत्कारिक सणसण अंगभर उसळत असताना! नीलेच्या यौवनाची कांतीं त्याच्या डोळ्या पुढं सारखी झळाळत होती. अभ्रकाच्या चूर्णा सारखा एकादा चूर 'झुळ झुळ झिळ झिळ' यापेक्षाहि कल्पनातीत नाजुक ध्वनि करीत कुठून तरी पडावा, त्याचा स्पर्शहि कळत नकळत जागवावा, तशी तिच्या वस्त्राची सळसळ बराच वेळ त्याच्या कानाशीं घोळत होती. तो चालत होता तों काहींसा सुंद आणि धुंद होऊन!

त्या दिवशीं निळ्या घरांत केवढी गडबड चालली होती! सामानाची ने आण. आंथरूणांची उलथापालथ. टेबलखुर्च्यांची जुळवाजुळव! जणूं काय एकादा राजपुत्र माधवरावकडं पाहुणचाराला येणार होता!

राजनगरला परत आल्यावर वामनची न् माधवरावांची एक दोन वेळां त्रोटक भेट झाली होती ती संध्याकाळीं अविनाशला शिकवायला आल्यावर! एकदा एक नकाशाचं जाडसं पुठोळं उघडून

हातातल्या पट्टीच्या तुकड्यानं रेषांची उंची मोजीत होते. कुणाची तरी चाहूल लागल्यामुळं चष्मा वर करून त्यांनीं पाहिलं होतं तों वामन दिसला होता. वामननं लगेच नमस्कार केला होता. तो मानेनंच स्वीकारल्याचं दर्शवून आणि किंचित् हसून किंवा हसल्याच्या अभिनय करून विचारलं होतं, 'काय, ठीक आहे ना!' आणि सभ्य शालीन उत्तर आल्यावर ते पुन्हां कामांत निमग्न झाले होते. आपण एवढं बोललों हेंच फार झालं, असा अर्थ त्या प्रकारांत होता कीं मोठ्या माणसांना इतराशीं बोलण्यासाठीं सहसा नसणारी सवड त्यावेळीं नव्हती? दुसऱ्या वेळीं ते ऑफिसमधल्या कुणातरी तोलामोलाच्या माणसाशी गप्पा छाटीत बसले होते. वामननं शिरस्त्याप्रमाणं नमस्कार केला होता आणि तो एक हात वर करून त्यांनी स्वीकारला होता. ह्या गडबडीच्या दिवशीं वामन घरांत शिरला तों माधवराव स्वतः उभं राहून नौकर माणसं खुर्च्या बरोबर जुळवीत आहेत की नाहींत, बैठक मनासारखी पसरीत आहेत कीं नाहींत, हें पहात होते, आणि फेर फार करवीत होते!

वामनला पहातांच त्यांनीं नेहमीसारखं किंचित् स्मित केलं. आणि काहीसं आठवल्यासारखं होऊन त्यांनीं कॅलेंडरकडं पाहिलं. जणूं वामनच्या नमस्काराचा कॅलेंडरकडं पाहून अर्थबोध होणार होता! लगेच ते म्हणाले,

"मास्तर चहा घेतल्याशिवाय आज जाऊं नका अं!"

कुणीतरी एकादा खात्यांतला बदलून जाणारा अधिकारी माधवरावांकडं उपहारासाठीं येणार असावा! पण जरा वेळानं

झालेल्या समारंभावरून लख्ख प्रकाश पडला! नीलेला दाखविण्याचा तो कार्यक्रम होता. आणि तिला पहाण्यासाठीं आलेल्या मंडळींत वामनचा 'भाच्याचा मित्र' ताळबंदे देखील होता!

नीला ताळबंदेला पसंत पडली होती! मंडळींना मानमरातबानं दारापर्यंत पोंचवून परतल्यावर माधवराव, बाजूच्या शिकविण्याच्या खोलींत बसलेल्या वामनला म्हणाले होते,

"मास्तर, अहो इथंच कां तुम्ही आणखी! बरी आठवण झाली, या महिन्याचा पगार नाहीं मागितलात तुम्ही. अविनाश पास झाल्यामुळं पांच रुपये जास्त द्यायचं टरविलं आहे मी. अन् तुमच्या सेवासंघानं माझ्या आजारांत मला जी मदत केली त्यासाठीं देणगी दाखल पन्नास रुपये मी बाजूला काढून ठेवले आहेत! जाताना घेऊन चला! अग नीला! मास्तरांना चहा दे!"

मग वामन कित्येक दिवस अमिट्टामारखें आपले व्यवहार करीत होता. एम्पायर ट्रेडिंग कंपनीत ग्राहकाला दिलेल्या सामानाची किंमत बरोबर न घेतल्यामुळं त्याचा न् दुकानदाराचा एकदोन वेळा खटका उडाला होता. पैसे वामननं भरले होते तरी मालक म्हणाला होता, 'तुम्ही माझा माल अशाच तऱ्हेनं विकणार कीं काय?' पैसे भरणार तरी कुठवर? काय, होतय् काय तुम्हाला?' अखेर रोजच्या विक्रीच्या नोंदणीच्या बुकांत बराच घोटाळा झाल्यामुळं वामनची तेथली नौकरी सुटली. अविनाशची शिकवणी त्यानं आपणहून सोडून दिली होती. पैसे पुरणार नाहींत म्हणून हॉटेलांत एकदांच जेवण होत होतं. झोपेवाचून रात्री जात होत्या. गणिताची वही न्

कुठल्याशा पुण्यशील मद्राशी माणसानं खास मॅट्रिकच्या मुलांसाठीं लिहून छापलेलं गणिताचं पुस्तक, पालथीं उलथीं होऊन एकमेकांच्या उरावर बसलीं होतीं. त्यांच्याकडं अलींकडं लक्षहि जात नव्हतं!

काय एकेक उत्पात झाले होते.

वामन दुःखाच्या न् अनिश्चितीच्या झपाट्यांत सापडला होता! आणि तात्ळबंदेनं त्याच्या आधी येऊन अन् भाड्यांत वाढ करून मदतीस नंबरची खोली ताब्यांत घेतली होती. जणूं सुदैव आणि संपत्तीच्या जोरावर वामनचा हा त्यानं पहिला मोठा पराभव केला होता! माधवराव आजारी होते. त्यानं जाग्रणं केलीं होतीं. परीक्षा बुडवून वर्ष घालविलं होतं! ह्या सर्वांचं मोल अखेर पन्नास रुपये देणगीनं आणि शिक्षणींच्या पगारांतल्या अल्पशा वाढीनं झालं होतं ....! आणि हा सर्व प्रकार झाला होता, उरकला गेला होता, तो नीलेनं थेट हृदयाळूयांत मामील झालेल्या माणसासारखा स्थीर चित्तानं पाहिला नव्हता कां?

जी नीळता कित्येक मनोज्ञ कल्पनाचं अधिष्ठान होती ती शून्य दृग्भ्रमाचीच एकादी अवस्था नव्हती तर काय?

चित्ताची पांगलेली अवस्था नीट झाल्यावर एकदा तो गोकुळा-बाहेर पडला आणि सरळ माधवरावांच्या खोलींत गेला! नेहमीसारखं किंचित स्मित करून न् चष्मा वर करून त्यांनीं पाहिलं न् म्हटलं,

"काय मास्तर, आजारी आहा? अलीकडे आल्यासारखे दिसला नाहींत—"

"आजारी आहे थोडासा"

"औषध घ्या! प्रकृतीची हेळसांड करूं नका! आमच्या डॉक्टरांना चिठ्ठी देऊं कां?"

"नको, औषध चालूं केलं आहे मी!"

नीला त्याचा आवाज ऐकून बाहेर आली होती आणि दारा आड उभी होती. जं बोलायचं तें एकवार मनोमन उच्चारांत वामन-म्हणाला,

"आपण जे पन्नास रुपये दिले होते ना, ते परत आणले आहेत मी! कारण संघ स्थगित झाल्याचं मला कळलं. मग मजजवळ कशाला ही रकम!"

त्यानं पैशाचं पाकीट माधवरावांच्या टेबलावर ठेवलं. नम-स्कार न करतांच तो खोलीबाहेर पडला. नीला दाराआड उभी होतीच.

नीला!... तो गर्द जांभळा वेष, तो मोत्याची माळ, अभ्र-काच्या चुन्याच्या वर्खासारखी कानाशीं घोळणारी ती वस्त्राची सळसळ...

एकाद्या विषकन्येचीं तीं आयुधं होतीं! खलुतेची इतकी सुंदर पुतळी वामननं जन्मांत पाहिली नव्हती! तिच्याहि अंगावर तिच्या पैशाचं पाकीट भिरकावून एक अक्षरहि न बोलतां तो निघून आला होता. 'वामन' अशी कुणी तरी हांक मारली म्हणून त्यानं एक दोन वेळां मागं परतून पाहिलं होतं इतकंच. पण तो भास होता.

पुन्हां त्या घरांत त्याला पाय ठेवायचा नव्हता. आतां तो

आणि त्याचा अभ्यास! सामन, गणिताचं पुस्तक, परीक्षा आणि त्याचं पास होणं एवढ्याच गोष्टी जगांत जिवंत होत्या. काळ, काम आणि वेगाचं तें गणित थोडंसं अवघडच होतं कीं काय? चोर तासी पांच मैलाप्रमाणं धांवत होता; फौजदाराला वर्दी मिळतांच तो घोड्यावर निघाला होता. त्याचा वेग होता तासी आठ मैल. चोराला पळाल्याला सात तास उलटून गेले होते. फौजदार निघाल्यापासून त्याला किती तासांत पकडूं शकेल, याचे आकडे मांडा करून उत्तर काढायचं होतं. चोर कोण होता आणि फौजदाराची भूमिका कुणाकडे होती, चोरानं कुणाच्या घरी दरोडा घातला होता आणि कां घातला होता, फौजदाराला त्याचा पाठलाग करणं आवश्यक होता कां! आणि तें तसं गृहित धरलं तरी चोराला तासी पांच मैल पळण्याचीच शक्ती कां दिली गेली होती, या प्रश्नाचीं उत्तरं मात्र त्या गणितकारानं मुळींच नोंदवून ठेवलीं नव्हती!

'ताळमेळ'ला मोठ्यान वाचण्याची संवय होती. तो वाचीत होता, "The Greek tragedy is the tragedy of impotence but the Elizabethian tragedy is the tragedy of power ...."

आणि मग त्यानं अशी कांहीं गंभीर चर्चा करून डोळे मिटून घेतले होते कीं जणूं विदेशी दुःखान्त नाटकांचं खरंखुरं रहस्य त्याला गवसलं होतं!

छे! तसा मुळींच प्रकार नव्हता. शेक्सपीयरच्या नाटका-ऐवजी एखाद्या जाड्या तत्त्वज्ञानं लिहिलेल्या 'व्हेनिसच्या व्यापाऱ्या' ऐवजीं

एकाद्या कादराबादच्या कल्हईवाल्याचं चरित्र जरी त्याच्या अभ्यास-क्रमांत असतं तरी तें त्यानं प्रस्तावनेसह तोंडपाठ करून ठेवलं असतं. इंग्रजी नाटकं वाचून मराठी नाटकांत एकादी मौलिक भर त्याला घालायची नव्हती. परीक्षेंत पास व्हायचं हेंच त्याला माहित! कारण बी. ए. झाला कीं तो सरळ तहसीलदारीकडं वळणार होता. तहसीलदार होण्यासाठींच पाठाचे न् लेखनाचे हे विलक्षण प्रकार करणं अवश्यक होतं. तहसीलदार होण्यासाठीं कपडे धुण्याचा अथवा बुटांना पॉलीस करण्याचा जरी मध्यंतरी एकादा क्रम असता, तरी तो त्यांतून सहज पसार झाला असता. अशा मंडळींची ही एक गोष्ट मोठी चांगली असते. त्यांना स्कॉलर म्हणून चमकायचं नसतं. नेमलीं गेलेलीं पुस्तकं विकत घ्यावयाचीं. त्यांना चांगले पुट्ठे घाला-यचे बुद्धी ग्रहण करील तेवढं रोज ऐकून घ्यावयाचं, वाचून काढायचं, घोकून ठेवायचं आणि परीक्षेंत ओकून टाकायचं. त्यांना पहिला वर्ग कधींच मिळत नाहीं. ते पास होतात ह्यांतच सारं कांहीं असतं. त्यासाठीच पेढे वाटले जातात. स्तुतीस्तोत्रांचा वर्षाव होतो. ज्ञानाची खरोखुरी ओढ त्यांना नसते. आधुनिक शिक्षणानं ज्ञानाचे विषय आणि साधना सुलभ केली होती, कीं त्यांचा दर्जा कमी केला होता? कीं ज्ञानलालसेत कांहीं विकृती आली होती? ताळबंदे एकदां तह-सीलदार झाला, कचेरी, क्लब, मोटार, आदराचे नमस्कार आणि मान-मरातबाचे प्रकार होऊं लागले, जमाबंदीचीं रजिस्टरं उलगडतां उल-गडतां अथवा पेरणीची पहाणी करण्यासाठीं खेडोपाडीं फिरतां फिरतां आसपासच्या घोळक्याला, हाताखालच्या कारकुनांना किंवा पाटील

पटवांऱ्यांना ग्रीक लोकांच्या नाट्यकलेवर व्याख्यान ऐकवणार नव्हता, किंवा 'व्हिक्टोरिया'च्या काळचीं आंग्लनाट्यकला कोणत्या दर्जाला येऊन पोंचली होती हें समजाऊन सांगणार नव्हता. घरून नियमानं मुबलक पैसे येत होते. अडचणी, चिंता काय असतात याची जाणीव नव्हती. तहसीलदारी कुठं तरी वाट पहात होती. त्या मोठेपणाला शोभेल अशी वधू सांगून आली होती. हुंडा, मानपानाच्या गोष्टी घराण्याच्या इभ्रतीला साजतील अशा तऱ्हेनं जुळुन आल्या होत्या. झालं. आतां आणखी काय मिळवायचं राहिलं होतं?

वामनचं तसं कुठं होतं?

इंग्रजींत ऐंशीऐंशी मार्क मिळविणं, गडकऱ्यांच्या नाटकाला कथा स्वरुप द्यायाची कल्पना बाळगिणं, गणेशोत्सवांचा हेतू 'विचार जागृती' आहे असं सांगणं आणि तसं करून दाखविणं, जोशी मास्तरांनीं दाखविलेल्या ग्रंथभांडारांत स्वतःला पुरून घेण्याची इच्छा करणं, फासावर चढण्याची स्वप्नं पाहणं, नीले सारख्या तरुणीवर प्रेम करणं, ह्या गोष्टी कोणत्या पिशाच्चानं त्याला करायला सांगितल्या होत्या कुणास ठाऊक?

अन् माधवरावचं करणं एका दृष्टीनं ठीकच नव्हतं का? आपल्या सुंदर मुलीला वामनसारखा नवरा शोभून दिसेल ही कल्पना त्यांच्या मनांत रुजावी कशी? कपासीच्या खरेदी विक्रींत आणि खाते वह्या भरून काढण्यांत त्याच्या वडिलांची हयात खर्च झाली होती. वामन हॉटेलांत एकदा जेवून काळ, काम, वेगाची गणित सोडवीत बसत होता. मॅट्रिक खेरीज पुढं त्याला जातां येणं शक्य नव्हतं. असं

घराणं आणि त्या घराण्यांतला अविनाशला मास्तर शोभेल किंवा आजारांत जागण्यासाठीं उपयोगी पडेल असा मुलगा जांवई म्हणून त्यांना काय शोभण्या सारखा होता ?

रिकामावेळ सांपडताच 'ताळबंदे' म्हणत होता,

'मिस्टर रांजणीकर, आमच्या लग्नाला तुम्हाला यायलाच पाहिजे, बरं कां ?'

अविनाश मधून मधून भेटत होता. आणि म्हणत होता,

'मास्तर आमच्याकडं येणं कां सोडलं तुम्ही ? तुम्हाला अभ्यास फार असतो होय ? एक म्हातारे मास्तर येत असतात आतां मला शिकवायला. ते मला आवडत नाहींत. ताई देखील विचारीत असते नेहमी !.......'

एकदां अविनाशनं वामनला रस्त्यात गाठलं आणि एक चिट्ठी दिली.

नलिनेनं लिहिलं होतं,

'मी आजारी आहे, एकदां येऊन भेट. शपथ आहे माझ्या गळ्याची !.......'

गळा कांपणं हाच ज्या सुंदरींचा स्वभाव त्यांनीं गळ्याची शपथ घालावी ह्यांत वावगं कांहीं नव्हतं

ताळबंदेसारख्या 'ध्येयव्रतां'च्या मंदिरापर्यंत तिचा **जीवन** प्रवास बिनधोक होणार होता. या दोघांच्याहि कीर्तीचे पोवाडे त्रि-भुवन गाणार होतं. वामनला कशाला बोलावलं होतं तिनं मग ?....

वामन तिच्या खोलीत शिरला तेव्हां ती पांघरूण घेऊन

पडली होती. आजाराचं तें सोंग होतं. कारण पांघरूण काढतांच साऱ्या प्रसाधनांनीं ती सज्ज दिसत होती. ती आणखी किती सोंगं करणार होती कुणास ठाऊक? 'ताळबंदे'च्या शयन मंदिरापर्यंत नेऊन सोडण्यासाठीं एखाद्या विश्वासू पहारेकऱ्याप्रमाणं सोबत करायला तिनं त्याला गळ्याची शपथ घालून बोलावलं होतं कीं काय?

पांघरूण बरोबर भ्रमाचाहि पडदा दूर करून ती म्हणाली, 'वामन! रागावलास हें मला समजतं. ज्या ज्या गोष्टी झाल्या त्याहि मला समजल्या. पण त्या होऊन गेल्यावर! वडिलांशीं विरोध करणं आतां मला जमणार नाहीं. मी स्त्रीमाणूस! तुला मी दुखवलं——'

लगेच एक हुंदका आला होता. त्यासरशी तिचं अंग क्षणेक थरारून गेलं होतं. जणूं रत्नदीपांना क्षणभर हेलकावा बसला होता!

तिनं जबरीनं त्याला जवळ ओढलं होतं न म्हटलं होतं, 'असेल तुझ्यांत धाडस तर उचल मला येथून आणि घेऊन चल कुठेंही! वाटेल तिथं मी तुझी सोबत करायला तयार आहे!....'

आणि अशी कांहीं कडकडून त्याला मिठी मारली होती कीं जणूं आतां धरणी दुभंगली तरी ती सुटणं शक्य नव्हतं!

पळवून न्यावयाला धाडसाची काय आवश्यकता होती? त्यातून उद्भवणारे पुढचे प्रश्न मात्र विचारांना झेपण्यासारखे नव्हते. राजनगरांत केवढा गलबला झाला असता. माधवरावांची मुलगी पळविली गेली, एथून सुरवात झाली असती. एक ह्मणाला असता, 'स्त्रियांना शिक्षण आणि स्वातंत्र्य द्यावयाचा हा परिणाम!' दुसरा ह्मणाला असतां, 'चालायचंच. विचारांचा पोंच नसला ह्मणजे तरुण मुलं

कांहीं तरी करतात झालं!' तशांतच एकादा शिष्ट आवाज आला असता, 'गोकुळांतली मुलं ह्मणजे काय? अहो तो रांजणीकर! माधवरावांच्या मुलीला पळवलं न् लेकानं! सभ्य माणसांनीं तरुण पोरं घरीं येऊंच देऊं नयेत मुळीं. अन् शिकवायला तर मुळींच नाहीं! तळशीकरांच्या घराण्याबरोबर ताळबंदेच्या वर हि केवढा कलंक येणार होता! एकदा तें कृत्य वाईट ठरल्यावर आणि तसं उघडकीस आल्यावर जोशी मास्तर, 'ज्ञानवर्धन' शाळा अशा कित्येक चांगल्या गोष्टींचा वामनच्या दुराचरणाशीं संबंध जुळविला गेला असता. जणूं ज्ञानवर्धनशाळा किंवा जोशी मास्तर मुली पळवून नेणाऱ्या विद्यार्थ्यांनाच निर्माण करूं शकत होते!....

अशा विचारांत वामन होता. आपलं सर्वस्व एकदांच आणि अखेरचं अर्पण करण्यासाठीं नीला शृंगार करून बसली होती. तिच्या शृंगाराला कांहींच अर्थ नव्हता. वामननं तिचं चुंबन घेतलं अथवा न घेतलं काय, सारखंच होतं. उद्या ताटातूट होणार ह्मणून घेतल्या आणि दिल्या जाणाऱ्या अखेरच्या 'चुबनां'तली त्यांत ओढ नव्हती. नवथर प्रीतीतला पोरकट उत्साह त्यांत नव्हता. किंवा निष्प्राण रोमिओच्या विषारलेल्या ओठावर ओठ टेकविणाऱ्या जुलिएटच्या उदास आवेगा इतकीही त्यांत उत्कटता नव्हती ....

वामन तेथून उठला तेव्हां नीला म्हणाली होती,

" पुन्हा केव्हां येणार वामन तूं ?"

इतक्यांत खाडखाड आवाज होऊं लागला. ताळबंदेचा सोन्याचा रथ वेगानं आला होता आणि निघून गेला होता. धूळ

इतकी उडाली होती कीं नीला त्या रथांत कोणत्या बाजूला बसली, हें पहातां आलं नव्हतं!

धुळीनं भरलेले डोळे चोळून तिशीच्या चौथऱ्यावर येऊन तो उभा राहिला तोंच त्याच्या कुटुंबियांचे चेहरे त्याला दिसूं लागले. 'वामन थांब जरा येऊं दे ना आम्हाला!' असं कांहींसं त्याची आई त्याला म्हणत होती. उतरत्या वयाच्या तिच्या चेहऱ्यावर सुरकुत्या दिसत होत्या, त्या जरेच्या किंवा कष्टांच्या म्हणण्यापेक्षा संसारांतील दुःख आणि संकटाशीं ती झगडत आली होती त्याचे ते एकेक आलेखच नव्हेत काय? तिची त्याग शील वृत्तीच इतकी उदात्त होती कीं कित्येक विश्वं तीवरून ओवाळून टाकावीं. जणूं वामनचे कित्येक जन्म उजळून टाकील एवढं तिच्यात सामर्थ्य होतं. स्वतःच्या पायांत एवढे कांटे मोडले होते तरी 'वामन जरा जपून चाल' अशी प्रेमगर्भ सूचना करायला ती विसरत नव्हती.

ही वामनची धर्मपत्नी! शिक्षणाचा संपर्क नाहीं.

"ध्येयव्रतांच्या मंदिरा"वर तालसुरांत आणि धीटपणानं कविता म्हणण्या इतके संस्कार झालेले नाहींत. नीलसौंदर्याची कुठं, एकादी छटाहि दिसत नाहीं. लग्न झाल्यापासून ती वामनची सोबत करूं लागली. त्याच्या अंतरंगांत तिला कधीच प्रवेश मिळाला नव्हता, पण त्याच्या दारावर आपल्या सर्वस्वाच्या एकमेव अलंकारासव अर्पणोत्सुक होऊन ती बसली होती. तिचा स्वीकार करणं न करणं हें वामनकडं होतं! स्वतःचं समर्पण करायचं एवढंच ती जाणत होती.

एकाद्या हॉटेलांतली खोली रात्रींपुरतीच भाड्यानं घेऊन रात्र मजेत घालवायची ही कल्पनाच मोठी गुदगुल्या करणारी असेल. पण निष्ठेचं आत्मसमर्पण भाड्यानं दिल्या घेतलेल्या कित्येक रात्रींतून आढळणं शक्य नव्हतं. व्यभिचारापासून वामनचं रक्षण झालं होतं, ह्यांतच तिचं केवढं सामर्थ्य होतं! हीं त्याचीं भावंडं आणि त्यांचा परिवार. वामनइतकी बुद्धीची उंची त्यांना साधतां आली नव्हती. पण एकेकाचा चेहरा म्हणजे काय विचारतां! जीवनाचा अर्थ खात्रीनं त्यांना उलगडला असला पाहिजे!

फक्त वामनचंच काय तें सामर्थ्य अपुरं पडत होतं. जीवनांतली समर्थदशा जिथून सुरूं होणार होती नेमकं तिथंच मोठमोठे उत्पात झाले होते. माणसानं माणसासाठीं निर्माण केलेल्या सर्वच गोष्टी त्या उत्पातांना कारण झाल्या होत्या. उत्पातानंतर उरलेलीं जीवनाचीं नुसतीं लक्तरं घेऊन मिरविण्यांत काय अर्थ होता? खुशाल एकाद्या सुमेरियन् किंवा खाल्डियन संस्कृति होऊन गेल्या त्यांच्याहि पूर्व काळांत विस्मृत अशा कित्येक कालखंडाच्या खोलवर लपून बसावं, किंवा भविष्यकाळाच्या त्या शेवटच्या टोकावर उभं राहून निरनिराळे रंग घेऊन येणारा जीवनप्रवाह नीट निरखून पारखून मगच त्याच्याशीं एकरूप व्हावं, हेंच योग्य नव्हतं कां?

समाप्त